सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ०८ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३१४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## विद्यार्थ्यांनो सावधान! परीक्षेत कॉपी कराल थेट तुरुंगात जाल

मुंबई : दहावी बारावीच्या बोर्ड परीक्षा काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. परीक्षा सुरु होताच यादरम्यान अनेक विद्यार्थ्यांकडून कॉपीचे प्रकरण समोर येते. प्रशासनाने कॉपीमुक्त राज्य करण्यासाठी अनेक नियम लागू करण्यात आले आहे. मात्र तरीही परीक्षेत कॉपी केल्याचे आढळून येत आहे. हे प्रकरण रोखण्यासाठी शिक्षण मंडळाने आता विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना जारी केली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी कडक उपाययोजना राबविल्या आहेत. त्यानुसार, परीक्षांमध्ये कॉपी करताना किंवा विद्यार्थ्यांना मदत करताना आढळल्यास विद्यार्थ्यांवर थेट फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार आहे. कॉपीमुक्त अभियान राबवत परीक्षेसाठी आवश्यक नियमावली विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे आणि त्याचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी केले आहे.

हॉल तिकीट विसरल्यासही परीक्षेला परवानगी

परीक्षेसाठी विद्यार्थी हॉल तिकीट विसरल्यास घाबरण्याचे कारण नाही असे परीक्षा मंडळाने स्पष्ट केले आहे. हॉल तिकीट नसल्यानाही विद्यार्थ्याला परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाईल, मात्र त्याच्याकडून हमीपत्र लिहून घेतले जाईल. पुढील दिवशी मात्र हॉल तिकीट आणणे अनिवार्य आहे. तसेच, परीक्षेसाठी वेशभूषेवर कोणतेही बंधन नसल्याचे मंडळाने स्पष्ट केले आहे.

# 'त्या '५ लाख महिला लाडकी बहीण योजनेसाठी अपात्र : आदिती तटकरे

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी
मुंबई, दि.७ फेब्रुवारी:

विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारसाठी 'गेम चेंजर 'ठरलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत आता सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. ज्येष्ठ नागरिक, संजय गांधी निराधार योजनातील लाभार्थी व घरात चारचाकी वाहन आहे ,त्यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. यातून तब्बल ५ लाख लाभार्थी लाडक्या बहिणींना वगळण्यात आले आहे, अशी माहिती राज्याच्या महिला विकास व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे

राज्याची आर्थिक परिस्थिती ठीक नसताना राज्य सरकारने गेल्यावर्षी ऑक्टोंबर मध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कार्यान्वित केली होती. त्याद्वारे २ कोटी ४९ लाख महिलांना

दर महिन्याला पंधराशे रुपये देण्यात येत होते. मात्र निवडणुकीनंतर या योजनेबाबत साशंकता निर्माण



करण्यात आली असून त्याच्या अटी व पात्रतेची फेर तपासणी अधिक कठोरपणे करण्यात येत आहे.

त्याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे.

ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने सरकारनं लाडकी बहीण ही योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत ज्या महिला योजनेच्या निकषात बसत नाहीत, त्या देखील या योजनेचा लाभ घेत असल्याचे सरकारच्या निर्दशनास आल्याने त्यांना वगळण्यात आले आहे अशी माहिती त्यांनी ' एक्स' वर दिली आहे.त्यात म्हटले आहे की,

२८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येत आहे.त्यामध्ये

संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या २ लाख ३० हजार महिला, वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या १ लाख १० हजार आणि कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या,स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १ लाख ६० हजार अशा एकुण ५ लाख जणांना अपात्र ठरविण्यात आले आहे येत्या आठ दिवसांमध्ये महिला व बालविकास योजनेतून घरोघरी जाऊन त्याची फेर तपासणी करण्याची सूचनाही सरकारकडून देण्यात आले असल्याचे म्हटले आहे.

सर्व पात्र महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबध्द आहे , असेही तटकरे यांनी म्हटले आहे.

त्यामुळे लाडके बहिण योजनेतील लाभार्थ्यांची संख्या आता २ कोटी ४४ लाख इतकी झाली आहे. यापुर्वी ती २ कोटी ४४ लाख इतकी होती.

### २१०० रुपये कधी मिळणार?

या योजनेतील लाभार्थी महिलांना २१०० रुपये देऊ अशी घोषणा महायुतीच्या नेत्यांकडून विधानसभा निवडणुकीपूर्वी करण्यात आली होती. त्यामुळे आता २१०० रुपये कधी मिळणार याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे. दरम्यान ,येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर लाडक्या बहिणींना या योजनेंतर्गत मिळण्याची शक्यता आहे.

## पराभव स्वीकारण्याची मानसिकता नाही, म्हणून राहुल गांधींची रडारड सुरु : चंद्रशेखर बावनकुळे

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.७ फेब्रुवारी : पराभव स्वीकारण्याची मानसिकता नाही, म्हणून राहुल गांधींची रडारड सुरू आहे अशी प्रत्युत्तर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे. दिल्लीत आज लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी खा . संजय राऊत व खा सुप्रिया सुळे यांच्यासमवेत पत्रकार परिषदेत घेऊन महाराष्ट्रातील वाढीव मतदारांच्या संख्येबाबत प्रश्न उपस्थित केले. त्याला बावनकुळे यांनी ' एक्स'वरून प्रत्युत्तर दिले आहे त्यात म्हटले आहे की, राहुल गांधी आणि विरोधक महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत झालेला दारुण पराभव स्विकारण्याच्या मानसिकतेत अजूनही आलेले नाहीत.

पराभवाच्या धक्क्यातून ते अद्याप सावरलेले नाहीत. म्हणून आता ते मतदारसंख्येवर संशय घेत आहेत. निवडणूक आयोगाने यापूर्वीच मतदार वाढीबाबत वारंवार स्पष्ट उत्तरं दिली आहेत, तरीही दिशाभूल करणारे आरोप करून लोकशाहीची बदनामी करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून सातत्याने केला जात आहे. उद्या दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. यात होणारा पराभव आधीच दिसत असल्यामुळे राहुल गांधी यांची रडारड आतापासूनच सुरू झाली आहे. जनतेनं काँग्रेस आणि त्यांच्या सहयोगी पक्षांना सातत्यानं नाकारले आहे, हे वास्तव स्वीकारण्याची त्यांची तयारी नाही. आता पराभव लपवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेवर शंका घेणे, हा निराशेचा कळस आहे.खरे तर या पत्रकार परिषदेत शेजारी बसलेल्या सुप्रिया सुळे यांनी 'मी याच ईव्हीएमवर विजयी झाले' असं सांगितले होते. पण राहुल यांना नौटंकी करायची असल्यानं ते सत्य स्वीकारणार नाहीत.

राहुलजी लोकशाहीवर विश्वास ठेवा, निराधार आरोप करून लोकशाहीची विटंबना करू नका. या देशातील जनतेला आपला खोटारडेपणा आता पुरता कळून चुकला आहे., असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

## मुंबईत ७ अवैध बांगलादेशींना अटक



मुंबई , ०७ फेब्रुवारी : भारतात अवैध्यरित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबई, नवीमुंबई, ठाणे यांसारख्या ठिकाणी बांगलादेशी नागरिक अवैध्यरित्या वास्तव्य करत आहेत.त्यामुळे या स्थलांतरीत बांगलादेशींना पकडण्याचे काम सध्या मुंबई पोलिसांनी सुरु केले आहे.अशातच मुंबईच्या चेंबूरमधील अवैधरित्या राहणाऱ्या सात बांगलादेशी नागरिकांवर पोलिसांनी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोहंग आशिर मुल्ला, जाहिदुल इस्लाम ईमुल, आलामीन शेख, सुमा जहीगीर आलम तुटूल, नोयम अफजल हुसेन शेख, तावमीना अख्तर राजू, सलमा मोकसद अली, अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.मुंबईच्या चेंबूरमध्ये माहूल गाव विभागात अवैध्यरित्या वास्तव्य करणाऱ्या सात बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हे सर्वजण मार्च २०२० पासून माहूल गावात एकत्र राहत होते. यात ३ पुरुष आणि ४ महिलांचा समावेश आहे. हे सर्वजण २५ ते ३५ या वयोगटात असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या या सात बांगलादेशी नागरिकांवर गु.नो. क्रमांक ६/२०२५ कलम-नियम ३ सह ६ पारपत्र (भारतात प्रवेश) १९५० सह परिच्छेद ३ (१) (अ) परकीय नागरिक आदेश १९४८ सह कलम १४ परकीय नागरिक कायदा १९४६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुण्यातील पीएसआयची लोणावळ्यात आत्महत्या

पुणे : महाराष्ट्राची शैक्षणिक पंढरी असलेल्या पुण्यातील पोलीस उपनिरीक्षकाने लोणावळ्यात जाऊन आपले जीवन संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. लोणावळ्यातील टायगर पॉईंटलगत त्यांनी झाडाला गळफास घेतल्याने पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

अण्णा गुंजाळ असे पोलीस उपनिरीक्षकांचे नाव असून त्यांनी नेमकी आत्महत्या का केली, याबाबतचे कारण अद्यापही अस्पष्ट आहे.

गुंजाळ हे खडकी पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत होते, मात्र तीन दिवसांपासून ते कर्तव्यावर नव्हते. तसेच त्यांचा संपर्कही होत नव्हता.



दरम्यान, शुक्रवारी त्यांचा शोध लागला असता, त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले आहे.

अण्णा गुंजाळ यांनी गळफास घेतल्याचे उघडकीस आल्यानंतर पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे. लोणावळ्यातील टायगर पॉइंटवर त्यांची गाडी सुद्धा आढळलेली आहे, या गाडीत एक डायरी आहे. कदाचित या डायरीमध्ये त्यांच्या आत्महत्येमागचे कारण दडलेले असू शकते.

पोलिसांकडून त्यांचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला असून पॉँईटवर असलेली गाडीही पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. आता, या कारमधील डायरीत त्यांनी मृत्यूपूर्व काही लिहून ठेवले आहे का, याचा तपास पोलिसांकडून घेतला जात आहे.

## गतिमान प्रशासनासाठी 'ई' ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि ७(जिमाका) – शासनाच्या सप्तसुत्री कार्यक्रमाअंतर्गत शासकीय सुविधा लोकाभिमूख आणि सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागा मार्फत 'ई'– ऑफिस प्रणाली वापरात आणली आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात 'ई' – ऑफिस प्रणाली प्रभावीपणे कार्यन्वित करण्यात आली असून, त्याचा व्यापक वापर सुरु आहे. कार्यालयीन कामकाज अधिक वेगवान आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने संगणक , स्कॅनर यासारखी साधने वापर करुन प्रणाली कार्यन्वित करण्यात आली आहे.

'ई' – ऑफिसद्वारे सर्व फाईल्स निर्गमित करण्यात येत आहेत. यामुळे कागदपत्रांचे डिजिटल स्वरुपात रुपांतर वेगाने होत आहे. सर्व उपविभागीय व तहसिल कार्यालयांतील कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

याचा परिणाम म्हणून ई फाईल्स आणि 'ई' – पावत्या मोठ्या प्रमाणात तयार होत आहेत. मागील दोन महिन्यांत २३०० फाईलीचे संग्रहण आणि पाठपुरावा घेणे सोपे झाले आहे. कामकाजात पारदर्शकता आणि जबाबदारी वाढली आहे. यामुळे अधिकाऱ्यांना तत्पर निर्णय घेण्यास मदत होत आहे.

'ई' – ऑफिसचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर देण्यात येणार असून लवकरच संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया डिजिटल करण्याच्या दिशेने वाटचाल केली जाणार आहे. असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

## जम्मू-काश्मीर : एलओसीवर ७ पाकिस्तानी घुसखोरांना कंठस्नान



श्रीनगर , ७ फेब्रुवारी : जम्मू-काश्मीरमधील कृष्णा घाटी येथे नियंत्रण रेषेवरुन काश्मीरमध्ये घुसखोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या सात पाकिस्तानी घुसखोरांना भारतीय लष्कराने ठार केले. या घसुखोरांमध्ये पाकिस्तानच्या कुख्यात बॉर्डर ॲक्शन टीममधील दहशतवादी आणि २ ते ३ पाकिस्तानी लष्कारी सैनिकांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना पूंछ जिल्ह्यातील कृष्णा व्हॅलीजवळ घडली.या पाकिस्तानी घुसखोरांचा भारतीय सैन्याच्या पुढच्या चौकीवर हल्ला करण्याची योजना होती. भारतीय सैन्याला याची माहिती मिळाली आणि त्यांनी आधीच हल्ला करून कट उधळून लावला. घुसखोरीदरम्यान मृत्युमुखी पडलेल्या ७ जणांमध्ये पाकिस्तानच्या बॉर्डर ॲक्शन टीमचे (बॅट) ३ ते ४ सदस्यही ठार झाले आहेत. ही टीम सीमापार ऑपरेशन्समध्ये तरबेज असून या पाकिस्तानी एजन्सीने यापूर्वीही सीमेवर भारतीय सैनिकांवर हल्ला केला आहे.या कारवाईत मारले गेलेले दहशतवादी अल बद्र ग्रुपचे सदस्य आहेत. काही दिवसापूर्वीच पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी भारतासोबतचे सर्व प्रश्न चर्चेद्वारे सोडवू असे सांगितले होते. दरम्यान, आताही घुसखोरी केल्याचा प्रयत्न समोर आला आहे.

## ट्राफिक पोलिसांशी वाद - गुन्हा दाखल

नगर : शहरातील डीएसपी चौक येथे शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पो. हे. कॉ. संजय बाजीराव दळवी हे वाहतूक नियमन करीत असताना

रहदारी नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मोटरसायकल चालक संजय सर्जेराव म्हस्के यांचेवर ई चलन दंडाची कारवाई केली. त्यावेळी दुचाकी चालक यांनी पो. हे. कॉ. श्री दळवी यांच्याशी वाद घातला व सरकारी कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी मोटरसायकल चालक यांचेवर भा. न्या. संहिता २२१ कलमान्वये तोफखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला असून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

सर्व वाहन चालकांनी रहदारीचे नियम पाळावेत. वाहतूक पोलीस आपल्या सुरक्षेसाठी असून त्यांना सहकार्य करावे, त्यांच्याशी वाद घालू नये असे आवाहन शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी केले आहे.

# गडचिरोली औद्योगिक इकोसिस्टीमच्या केंद्रस्थानी असेल : मुख्यमंत्री

### डावोसमधील सुमारे ५ लाख कोटींचे करार केवळ विदर्भासाठी 'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५- खासदार औद्योगिक महोत्सवा'चे उद्घाटन

नागपूर, ०७ फेब्रुवारी : देशातली सर्वात मोठी औद्योगिक इकोसिस्टीम विदर्भात गडचिरोलीला केंद्रस्थानी ठेऊन तयार होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नागपुरात आयोजित 'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५– खासदार औद्योगिक महोत्सवा'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे; उद्योगमंत्री उदय सामंत, सोबतच, सज्जन जिंदाल, बालसुब्रह्मण्यम प्रभाकरन, रोशनी नादर मल्होत्रा, अतुल गोयलसारखे प्रसिद्ध उद्योगपती तसेच, अतुल सावे, संजय राठोड, डॉ. अशोक उईके, आकाश फुंडकर ,संजयसावकारे, आशिष जयस्वाल, पंकज भोयरआणि इंद्रनील नाईक हे नेते उपस्थित होते. पूर्व सेनाअध्यक्ष मनोज पांडे, इंडिगो एयरलाईन्स आर के सिंग हे मान्यवर देखील



उपस्थित होते. यावेळी गडकरी आणि फडणवीस यांच्या हस्ते मंचवरील उद्योजकांचा सत्कार करण्यात आला.

गडचिरोलीमध्ये होऊ घातलेल्या 'स्टील रेवोल्युशन'चा फायदा नजीकच्या सर्व जिल्ह्यांना होईल, असा विश्वास व्यक्त करताना फडणवीस म्हणाले की, वर्धन लिथियमच्या ४२ हजार कोटींच्या सामंजस्य करारामुळे विदर्भात एक पथदर्शी इकोसिस्टीम तयार होत आहे. 'कॉटन टू फॅशन' अशी परिपूर्ण इकोसिस्टीम अमरावतीमध्ये पीएम मित्र पार्कच्या माध्यमातून तयार होत आहे.

संरक्षण विषयक उत्पादनात लागणाऱ्या कापसाच्या उपयोगितेबद्दल देखील माहिती देत त्यांनी संभाव्य इकोसिस्टीमबद्दल त्यांनी चर्चा केली. एव्हिएशनच्या क्षेत्रात नागपूर एअरपोर्टचा विकास करून इमीगरेशन आणि बॅगेज हॅण्डलिंगची सुविधा कशी आणता येईल, याबद्दल चर्चा सुरू आहे असे ते म्हणाले. बुटीबोरीमध्ये ईव्ही ऑपरेटरचा एमओयू करणार असून दहा हजार युवकांना ईव्ही ऑपरेटर्सच्या रूपाने ट्रेनिंग देऊन रोजगार देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तेलंगाना आणि आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र सरकार यांनी मिळून पोर्ट जोडण्याच्या दृष्टीने दावोस मध्ये चर्चा केल्याचे फडणवीस यांनी सांगितले. एचसीएलच्या रोशनी नडार मल्होत्रा यांनी नागपूरला 'फायनान्शिअल हब फॉर एआय' मध्ये परिवर्तित करण्याचा मानस व्यक्त केला.

गडचिरोली ५ वर्षात 'स्टील हब' होईल – नितीन गडकरी

आगामी ५ वर्षात गडचिरोली हे भारताचे स्टील हब होईल आणि संपूर्ण विश्वात गडचिरोलीतून निर्यात होईल असा विश्वास केंद्रीय मंत्री गडकरी यांनी व्यक्त केला. चंद्रपूर आणि भद्रावती मध्ये ग्रीन स्टील विषय प्रकल्प येत असल्याचे देखील ते म्हणाले. रायपूर ते विशाखापट्टणम ३६ हजार कोटींचा एक्सप्रेस हायवे आपण तयार करत असल्याचे सांगून गडचिरोली जिल्ह्यातून थेट रायपुर-विशाखापट्टणम एक्सप्रेस हायवेला जोडून आपण माल निर्यात करू शकाल आणि गरज भासल्यास काकीनाडाला देखील घेऊन जाऊ म्हणजे मुंबईला जाण्याची गरज न पडता दळणवळणाचे खर्च कमी होतील आणि जगभरात इथून निर्यात होईल असे ते म्हणाले. याशिवाय सिंचन प्रकल्पांचा १०० टक्के वापर व्हावा यासाठी देखील धोरण निश्चिती करावी आणि स्थानिक नेत्यांना जबाबदारी द्यावी असं निवेदन त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना केले.

विदर्भात ३ लाख कोटींची गुंतवणूक होणार – सज्जन जिंदल

विदर्भात आगामी काही वर्षात तीन लाख कोटींची गुंतवणूक होणार आहे. नागपुरात आम्ही बॅटरी तयार करण्याचा प्लांट सुरू करणार आहोत. सोलरचे बॅटरीज बनवण्याचा प्लांट नागपुरात नवी बुटीबोरीमध्ये होणार आहे, अशी माहिती उद्योगपती आणि जेएसडब्ल्यूचे सज्जन जिंदल यांनी दिली. गडचिरोलीमध्ये जेएसडब्ल्यू कडून २५ मिलियन टनचा स्टील प्लांट लावण्यात येणार आहे. हा केवळ जगातला सर्वात मोठाच नाही तर सर्वात सुंदर आणि पर्यावरणपूरक असा स्टील प्लांट असेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

## विठ्ठलभक्तांना दर्शनासाठी १८ तास मिळणार

सोलापूर, ७ फेब्रुवारी : पंढरपुरात माघ एकादशी यात्रेला दरवर्षी सुमारे ४ ते ५ लाख भाविक येतात. यात्रेनिमित्त भाविकांची होणारी गर्दी विचारात घेता, त्यांना सुलभ व जलद दर्शनासाठी प्राधान्य देण्यात येणार असून, त्यासाठी पुजांची संख्या कमी करून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत दर्शन उपलब्ध राहणार आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्याचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले. पत्राशेड येथे तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रुग्णालयामार्फत दर्शन मंडप येथे आयसीयू तसेच माळवदावर वैष्णव चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे. मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रुग्णवाहिका ठेवण्यात आल्या आहेत. श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये दुपारी १२ ते २ व रात्री ७ ते ९ या वेळेत अन्नदान सुरू आहे.

## जाहीर प्रगटन

**विद्यमान श्रीमती ए. आय. आवटी मॅडम साहेब, दिवाणी न्यायाधीश क' स्तर साहेब कन्नड, यांचे न्यायालयात**

सी.एम.ए ६२/२०२५

पुढील तारीख २७/०२/२०२५

अर्जदार : ताराचंद लक्ष्मण राठोड, वयः ७५ वर्ष धंदा शेती रा रेल तांडा, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय : वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरर्शिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार ही वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांचे मयत वडील नामे के लक्ष्मण धनु राठोड असून त्यांचा मृत्यू दिनांक ०२/०२/२०१२ रोजी रेल तांडा, तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे ग्रामपंचायत रेल तांडा, तालुका कन्नड येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे असे की सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ हे मयत यांची मुलगा आहे. मयत याची पत्नी नामे कै. गोबाबाई लक्ष्मण राठोड ही होती तिचा मृत्यू दिनांक २०/०४/२०१६ रोजी मयत झाली आहे सोबत तिथेही मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे व अर्जदारास कोणीही भाऊ-बहीण नाही. असे की, सदरील अर्जदाराशिवाय मयत वडील नामे के लक्ष्मण धनु राठोड यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा रेल तांडा तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी/ ग्रामपंचायत, तहसील इत्यादी) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले

सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल

दिनांक ०७/०२/२०२५

आदेशावरून

क. लिपीक — सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.ए. आय आवटी दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि. की. अर्ज क्र. ३८२/२०२४

पुढीलतारिख २७/२/२०२५

अर्जदार : १ श्री वाच्छु पिता मलखान जाधव वय ७० वर्षे, धंदा शेती रा. सितानाईकतांडा ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर २- सौ. जिजाबाई भ्र. जगन चव्हाण वय ५९ वर्षे, धंदा-शेती, रा. तवल्यागड तांडा ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फेः जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. अनिल जी. राठोड यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्रं १ हा मयताचा पुतणा आहे व अर्जदार कमांक २ ही मयताची पुतणी आहे. मयत सरिचंद फुला जाधव हे दिनांक १७/०१/१९९५ रोजी मयत झालेले आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेऊन या असे सांगितल्यावरून सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयताचे वारस असून अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. तसेच वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर अक्षेप वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून तिस (३०) दिवसांच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर अक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक. २७/१/२०२५

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर यांचे न्यायालयात**

सिव्हिल एम.ए. क्र.९४/२०२५

पुढील तारीख २५/०३/२०२५

अर्जदार : १) सुनिता भ्र. मनोहर तोडकर, वय ४४ वर्षे, धंदा गृहिणी रा. मांडवा पो. वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) कृष्णा पि. मनोहर तोडकर, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क. आई अर्जदार क.१३) सौ. गोदावरी गणेश पंडीत, वय २२ वर्षे धंदा गृहिणी, रा. रांजणगाव नरहरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर४) पुनम पि. मनोहर तोडकर, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण रा. मांडवा पो. वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) लिलाबाई भ्र. त्रिंबक तोडकर, वय ७६ वर्षे, धंदा निरंक, रा. मांडवा पो. बाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. व्ही. एस. काळे पाटील यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने मख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे व अर्जदार क्र.५ ही अर्जदार क्र. १ ची सामु व अर्जदार क्र.२ ते ४ यांची आजी (वडीलांची आई) आहे. अर्जदार क्र.१ चे पति, अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र.५ चा मुलगा नामे मनोहर त्रिंबक तोडकर हे मौजे मांडवा ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०६/०१/२०२५ रोजी मौजे मांडवा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे मयत मनोहर त्रिंचक तोडकर यांना अर्जदार क्र.१ ते ५ असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारस प्रमाणपत्राची मागणी केली आह.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीम कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दतीनंतरचा आक्षेपउजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यानों मागणी कल प्रमाण वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनाक / /२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर यांचे न्यायालयात**

सिव्हिल एम.ए. क्र.१०३/२०२५

पुढील तारीख १२/०३/२०२५

अर्जदार : १) संदिप रुस्तुम घिगे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रामनाथ रुस्तुम घिगे, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) योगेश रुस्तुम घिगे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) भागुबाई रुस्तुम घिगे, वय ६७ वर्षे, धंदा शेती, रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ अंड श्री. व्ही.एस. काळे पाटील यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसांत नात्यानं मख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.४ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र.४ चं पति नाम रुस्तुम खंडेराव धिगे हे मौजे दायगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १७/०४/२०२३ गंजी मौजे दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत रुस्तुम खंडेराव घिगे यांना अर्जदार क्र.१ ते ४ असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्धीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक दिल. / / २०२५ रोजी

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ७२/२०२५

अर्जदार : १. सरिता दिगंबर तायडे, वय. ३७ वर्ष धंदा. शेती २. गौरव दिगंबर तायडे, वय. १७ वर्ष धंदा. शिक्षण करिता अ.पा.क. आई अर्जदार नं. १ सरिता दिगंबर तायडे ३. ऋषिकेश दिगंबर तायडे, वय. १५ वर्ष धंदा. शिक्षण करिता अ.पा.क. आई अर्जदार नं. १ सरिता दिगंबर तायडे सर्व रा. देवळी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, असे की, अर्जदार नं. १ चे पति व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल नामे दिगंबर येडू तायडे हे दि. ०८/०१/२०२५ रोजी मौजे देवळी ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे मयत दिगंबर येडू तायडे यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत दिगंबर येडू तायडे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत दिगंबर येडू तायडे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुट्टीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत दिगंबर येडू तायडे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ४५/२०२५.

अर्जदार : १. अल्का सुरेश अवतारे, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. जवळा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. आदर्श सुरेश अवतारे, वय ३१ वर्षे, धंदा मजुरी, रा. जवळा, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ३. सतीष सुरेश अवतारे, वय २४ वर्षे, धंदा मजुरी, रा. जवळा, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर स्यगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सुरेश चांगो अवतारे यांचा दिनांक १९/०७/२०२४ रोजी एमजीमए हॉस्पीटल कामोठे पनवेल येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत सुरेश चांगो अवतारे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ७/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १२/०३/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीकसहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज.क्रं. ७६/२०२५. पुढील तारीख २४/०३/२०२५

अर्जदार : १. अब्दुल रज्ज़ाक शेख अहेमद, वय ७० वर्षे, धंदा सेवा निवृत्त, रा. बडा बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. शेख नजर अहेमद अब्दुल रज्ज़ाक, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. बडा बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. जुलेखा बेगम भ्र. सलीम शेख, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. टिळक नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. मलेका बेगम भ्र. एजाज खान पठाण, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. करीम नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. सादिका भ्र.अमिन शेख, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सातकुंडा पो. अंधानेर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. सालेहा पिता रज्ज़ाक शेख, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. बडा बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ७. अफिफा बेगम भ्र. इमरान शेख, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. बडा बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. ॲड. एन.एम. शेख यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ हा मयत खालेदा बेगम भ्र. रज्ज़ाक शेख यांचे पती असून अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ ते ७ ह्या मयताच्या मुली आहे. अर्जदार क्र. २ ते ७ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ हे त्यांचे वडील आहे. अर्जदार क्र. १ ते ७ हे मयत खालेदा बेगम भ्र. रज्ज़ाक शेख यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ७ यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ ची पत्नी व अर्जदार क्र. २ ते ७ यांची आई नामे खालेदा बेगम भ्र. रज्ज़ाक शेख ह्या मौजे कन्नड ता. कन्नड येथील रहिवाशी होत्या. मयत खालेदा बेगम भ्र. रज्ज़ाक शेख ह्या दि.२४/१०/२०२४ रोजी कन्नड येथे आजारपणामुळे मरण पावल्या आहे. अर्जदार क्रं. १ ते ७ यांना मयत खालेदा बेगम भ्र. रज्ज़ाक शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी, कार्यालय, नगर परिषद कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ७ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. मयत खालेदा बेगम भ्र. रज्ज़ाक शेख ह्या मौजे कन्नड, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झालेली आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ७ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक ११/१२/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०४/०२/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५२/२०२५.

पुढील तारीख २४/०२/२०२५.

अर्जदार : १. किसन पिता झिपा राठोड, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. पागंरा तांडा, पो. नागद, ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर. २. मुलचंद पिता किसन राठोड, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. पांगरा तांडा, पो. नागद, ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर. ३. बालचंद पिता किसन राठोड, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. पांगरा तांडा, पो. नागद, ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस.एन. उपासनी यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाण येथील राहणारे असून अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून मा. न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. अर्जदार क्र. १ पत्नी व अर्जदार क्र. २ ते ३ यांची आई नामे हिराबाई किसन राठोड ही दिनांक ०८/०९/२०२४ रोजी मौजे पांगरा तांडा, ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झाली आहे. त्याच प्रमाणे अर्जदार क्र. १ चा मुलगा व अर्जदार क्र. २ व ३ यांचा भाऊ नामे थानसिंग किसन राठोड हे देखील दिनांक २०/०९/२०२० रोजी मयत झालेले आहे. मयतांच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेचन्यायालयात नावाने असलेल्या नोंदी वारस कायद्याप्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारांशिवाय मयतांना कोणतीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसांचे प्रमाणपत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसूल दप्तरी नोंद करण्यासाठी वारस कार्यवाही करणेसाठी तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालयात इत्यादी ठिकाणी आवश्यक असल्याने वारस प्रमाणत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :-३०/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. १४१/२०२४

अर्जदार १-मंगेश आबासाहेब तायडे, वय- ३४ वर्षे, धंदा- शेती. रा. नागापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद २-लक्ष्मीनारायण आबासाहेब तायडे, वय- ४३ वर्षे, धंदा- शेती, रा. नागापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) रजनी नारायण डोंगरे, वय- ३९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. साई वृंदावन कॉलनी औरंगाबाद ४) सुरेखा आबासाहेब तायडे, वय- ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापूर ता. कन्नड जि. औरंगाबाद ५) यमुनाबाई भ्र. यादवराव तायडे, वय ८५ वर्षे, धंदा- नाही, रा. नागापूर ता. कन्नड जि. औरंगाबाद

-विरुध्द-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे-जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्याचे विधीज्ञ डी.डी. जोशी यांच्या मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ-बहीनी असून अर्जदार क्र. ४ ही अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई आहे. तसेच अर्जदार क्र. ५ ही अर्जदार क्र. १ ते ३ यांची आजी व अर्जदार क्र. ४ यांच्या सासु आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचे पती व अर्जदार क्र. ५ यांच्या मुलागा आबासाहेब यादवराव तायडे हे होते ते दिनांक २२/०३/२०२१ रोजी राहत्या घरी मौजे नागापुर येथे वृध्दापकाळाने मयत झालेले असुन त्यांच्या अंत्यविधी मौजे नागापुर येथेच झालेला आहे. अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी. तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी तसेच तहसिल कार्यालय नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी सांगीतल्यावरुन सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन अर्ज दाखल करीत आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे एकमेव वारस असुन अर्जदार क्र. १ ते ५ शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. एकमेव अर्जदार क्र. १ ते ५ हे अर्जदार क्र. १ ते ३ यांचे आजोबा अर्जदार क्र. ४ यांचे सासरे व अर्जदार क्र. ५ यांचे पती यादवराव लहानुजी तायडे हे दिनांक ११/१२/२०२३ रोजी मयत झालेले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.

दिनांक ०७/०२/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी, न्यायालय क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि. की. अर्ज क्र. ३२२/२०२४

पुढील तारिख २८/०२/२०२५

अर्जदार : १) श्री बिसन पिता छगन जाधव वय ८० वर्षे, धंदा-शेती, रा. जैतखेडातांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद २) श्री त्रिंबक पिता छगन जाधव वय ७८ वर्षे, धंदा-शेती, रा. जैतखेडातांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३) श्री काळू पिता छगन जाधव वय ५५ वर्षे, धंदा-शेती, रा. जैतखेडातांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४) सौ. कलीबाई भ्र. नामदेव राठोड वय ७६ वर्षे धंदा शेती, रा. कोळंबीवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५) सौ. कालीबाई भ्र. त्रिंबक चव्हाण वय ४५ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. हिवरखेडा गौताळा ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदारः: महाराष्ट्र शासन तर्फेः जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. अनिल जी. राठोड यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्रं १ ते ३ हे मयताचे मुले आसुन अर्जदार क्रं ४ ते ५ मयताचे मुली आहेत, मयत नामे छगन मन्साराम जाधव हे अर्जदार क्रं. १ ते ५ चे वडिल होते ते दिनांक २३/०५/२०१९ रोजी वृधापकाळाने जैतखेडा तांडा येथे राहत्या घरी मयत झालेले आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेऊन या असे सांगितल्यावरून सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार क्रं. १ते ५ हे मयताचे वारस असून अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. तसेच वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर अक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून तिस (३०) दिवसांच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर अक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक: २३/१/२०२५

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज. नं. ४३/२०२५.

पुढील तारीख ०३/०३/२०२५

अर्जदार : १. दिलशातबी भ्र. नसीर शेख, वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बडा बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. हरुन पिता नसीर शेख, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. छम्मन, कत्रड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. फारुक पिता नसीर शेख, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. बडा बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. अजहर पिता नसीर शेख, वय ४५ वर्षे, धंदा - शेती, रा. बडा बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. जफर पिता नसीर शेख, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. छम्मन का बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. फरजाना भ्र. अतिक शेख, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. बडा बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी. एन. चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ही मयत नसीर पिता मुनीर शेख यांची पत्नीआहे. अर्जदार क्र. २ ते ५ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. ६ ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र. २ ते ६ हेआपसात सख्खे भाऊ बहिणअसून अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत नसीर पिता मुनीर शेखयांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ६ यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील नामेनसीर पिता मुनीर शेख हे मौजे कन्नड, ता. कन्नड येथील रहिवाशी होते. मयत नसीर पिता मुनीर शेख हे दि.०७/०३/२०२४ रोजी मौजेकत्रडता. कन्नड जि. औरंगाबाद येथे वृद्धपकाळाने मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ यांना मयत नसीर पिता मुनीर शेखयांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ६ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. मयत नसीर पिता मुनीर शेखहे मौजे कन्नड, ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक १०/१२/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणताही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायलयात स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप दाखल करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

दि. ०१/०२/२०२५.

आदेशावरून

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज.क्रं. ४४/२०२५.

पुढील तारीख ०१/०३/२०२५

अर्जदार : १. सुमनबाई भ्र. उदा राठोड, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. आंबा तांडा. ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. नंदु पिता उदा राठोड, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. आंबा तांडा. ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. चंदु पिता उदा राठोड, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. आंबा तांडा. ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. गुलाब पिता उदा राठोड, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. आंबा तांडा. ता. कत्रड जि. औरंगाबाद. ५. वसंत पिता उदा राठोड, वय ४० वर्षे, धंदा मजुरी, रा. आंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. कमलाबाई भ्र. पुनरदास चव्हाण, वय ४२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. वलठाण तांडा, ता. चाळीसगांव जि. जळगांव

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस (Legal Heirship Certificate) प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी. एन. चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत उदा हरी राठोड यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ते ५ हे मयातचे मुले असून अर्जदार क्र. ६ ही मयताची मुलगी आहेत. अर्जदार क्रं. २ ते ६ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत उदा हरी राठोड यांचे कायदेशीर वारस आहे. या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील नामे उदा हरी राठोड हे दि.२५/०२/२०१८ रोजी मौजे आंबा तांडा. येथे मरण पावले आहे. अर्जदार क्र. १ ते ६ यांना मयत उदा हरी राठोड यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ६ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क. १ ते ६ हे व मयत उदा हरी राठोड हे मौजे आंबा तांडा. ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी आहेत तसेच मतय उदा हरी राठोड हे मौजे आंबा तांडा. येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०६/१२/२०२४ रोजी मौजे आंबा तांडा. ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणताही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायलयात स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप दाखल करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

दि. ३/०२/२०२५.

आदेशावरून

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज. कं.४८/२०२५. पुढील तारीख १७/०२/२०२५

अर्जदार : १. मोईज पिता मुसा शेख, वय ६८ वर्षे, धंदा शेती, रा. बाजार पेठ, कत्रड, ता. कञ्जड जि. औरंगाबाद. २. मुजिब पिता मुसा शेख, वय ६७ वर्षे, धंदा शेती, रा. बाजार पेठ, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. अतिक पिता मुसा शेख, वय ४७ वर्षे, धंदा व्यापार, रा. छम्मन का बंगला, कत्रड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. नफिसा भ्र. सिकंदर शेख, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. न्यू आझाद नगर, मालेगांव ता. मालेगांव जि. नाशिक ५. मुकिद पिता मुसा शेख, (मयत दि. १४/०५/२०१४ चे बारस) ५.१. रुकैया परवीन भ्र. मुकीद शेख, वय ४१ वर्षे, धंदा - मजुरी / घरकाम, रा. छम्मन का बंगला, बाजारपेठ, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.२ जैनब कौसर पिता मुकीद शेख, वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा. बाजारपेठ, कत्रड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.३ असमत पिता मुकीद शेख, वय २२ वर्षे, धंदा घरकाम, रा. बाजारपेठ, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.४ मोहम्मद माज पिता मुकीद शेख, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. बाजारपेठ, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.५ अब्दुल हादी पिता मुकीद शेख, वय १६ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्र. ५.१, ६. शहमीम बेगम भ्र. वाहब शेख, (मयत दि.०३/१०/२०१२ चे वारस) ६.१ शोएब पिता अब्दुल वाहब शेख, वय ३२ वर्षे, धंदा मजुरी, रा. आयशा नगर, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ६.२ निकहत परवीन भ्र. अब्दुल वाहब शेख, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. भिलपल्टन गल्ली, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६.३ सानिया पिता अब्दुल वाहब, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. आयशा नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ७. नसिमबी भ्र. मकसूद शेख, (मयत दि.०६/०२/२०२३ चे वारस) ७.१ सईद पिता मकसूद शेख, वय ३८ वर्षे, धंदा व्यापार, रा. बडा बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ७.२ वसीम पिता मकसद शेख, वय ३८ वर्षे, धंदा व्यापार, रा. छम्मन का बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ७.३ यास्मीन भ्र. इरफान शेख, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. बडा बंगला, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी. एन. चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ७ हे मयत मुसा मुनीर शेख यांचे मुले व मुली होती व आहेत. मयत मुसा मुनीर शेखांना अर्जदार क्र. १ ते ७ हे कायदेशीर वारस आहे. मयत मुसा मुनीर शेख दिनांक ०९/०४/१९९७ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे मरण पावले आहे. तसेच त्यांची पत्नी जिलानीबेगम मुसा शेख ही सुद्धा दिनांक ०८/११/१९८६ रोजी मयत झाली आहे. मयत मुसा मुनीर शेख यांना अर्जदार क्र. १ ते ७ अशी एकूण ७ आपत्य होती. त्यापैकी अर्जदार क्र.५ मुकीद पिता मुसा शेख मुलगा व अर्जदार क्र. ६ शहमीम बेगम भ्र. वाहब शेख व अर्जदार क्र. ७ नसिमबी भ्र. मकसूद शेख मुली ह्या मयत झाले असून त्यांचे ईतर आपत्य हे हयात आहे. मयताचा मुलगा अर्जदार क्र.५ मुकीद पिता मुसा शेख हा दि. १४/०९/२०१४ रोजी मौजे कत्रड ता. कनड येथे मयत झाला असून त्यांना अर्जदार क्र. ५.१ ही पत्नी असून अर्जदार क्र. ५.२ व ५.३ ह्या मुली व अर्जदार क्र. ५.४. व ५.५ हे मुले आहेत. या व्यतिरिक्त मयत मुकीद पिता मुसा शेख यांना इतर कोणीही वारस नाही. तसेच मयताची मुली अर्जदार क्र. ६. शहमीम बेगम वाहब शेख ही दि. ०३/१०/२०१२ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे मयत झाली असून तीस अर्जदार क्र. ६.१ हा मुलगा असून अर्जदार क्र. ६.२ व ६. ३ ह्या मुली आहेत. या व्यतिरिक्त मयत शहमीम बेगम वाहब शेख हिस इतर कोणीही वारस नाही. तसेच अर्जदार क्र. ७ नसिमबी भ्र. अब्दुल वाहब शेख ही सुद्धा दि. ०६/०२/२०२३ रोजी मौजे कनड ता. कन्नड येथे मयत झाली असून तीस अर्जदार क्र. ७.१ व ७.२ हे मुले असून अर्जदार क. ७.३ ही विवाहित मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयत नसिमबी भ्र. अब्दुल वाहब शेख हिस इतर कोणीही वारस नाही. अर्जदार नं. १ ते ७ यांना मयत मुसा मुनीर शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार नं. १ ते ७ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार कं. १ ते ७ हे व त्यांचे मयत वडील नामे मुसा मुनीर शेखहे मौजे कन्नडयेथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ७ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१२/१२/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणताही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायलयात स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप दाखल करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

दि. ३१/०१/२०२५.

आदेशावरून

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

# जरंडी येथील कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या



सोयगाव,दि.७ फेब्रुवारी : सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील कर्जाच्या ओझ्याखाली विवंचनेत असलेल्या ४७ वर्षीय शेतकऱ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळ जनक घटना गुरुवारी रात्री दहा वाजता घडली याप्रकरणी रात्री अकरा वाजता सोयगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,सादिक तडवी,यांनी घटनेचा पंचनामा केला आहे.रात्री सोयगाव पोलीस ठाण्यात शेतकरी आत्महत्येची नोंद करण्यात आली आहे.

राजेंद्र मोतीराम घनघाव (वय ४७) असे गळफास घेवून आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याचे नाव आहे जरंडी शिवारात त्यांची गट क्र-२८० मध्ये पाच एकर शेती आहे खरिपात झालेले नुकसान आणि रब्बी तही बाधित झालेल्या पिकांची अवस्था पाहून कर्जबाजारी शेतकऱ्याने कर्जाच्या ओझ्याखाली विवंचनेत आत्महत्या केली असून त्यांचे कडे युनियन बँकेचे पीक कर्ज तीन लाख रु आणि खासगी कर्ज तीन लाख रु असे एकूण सहा लाख रु कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या या शेतकऱ्याने कर्ज फेडण्याची चिंतेत आत्महत्या केली रात्री साडे अकरा वाजता महसूलच्या पथकाने घटनेचा पंचनामा केला आहे.दरम्यान शुक्रवारी सकाळी अकरा वाजता त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन भाऊ,तीन मुली,एक मुलगा,असा परिवार आहे.

# जुन्या काळातील भांडी ठरताहेत केवळ 'शोपीस'

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ फेब्रुवारी : ग्रामीण भागातील घराघरात जुन्या काळात वापरली जाणारी तांब्या पितळेची,मातीची तसेच ल्युमिनियमची भांडी केवळ शोपीस बनवून राहिली आहेत.सध्या या भांड्यांचा वापर होत नसला तरी अनेक ठिकाणी जतन केल्याचे पाहावयास मिळत आहे.

**स्वयंपाकघरात या सर्व जुन्या भांड्यांचा दररोज वापर होता. त्या काळातील स्त्रिया या भांड्यांची वेळोवेळी स्वच्छता ही ठेवायच्या.मात्र,आता या भांड्यांचा वापर होत नाही. सध्याच्या स्वयंपाक घरातील जागा आधुनिक भांड्यांनी घेतली आहे. या भांड्यांकडे पाहिले की आम्हाला पूर्वीचे दिवस आठवतात.**

**– मिना शेवाळकर, गृहिणी, सोयगाव**

जुन्या काळात स्वयंपाकघरात तांबे,पितळ,ल्युमिनियम धातूची घागर,पिंप,ग्लास,ताट,वाटी,तंब्या,मोठमोठाले तांब्याचे हंडे तसेच उन्हाळ्याच्या दिवसात मातीचे माठ, मोगा,घट,तरळ अशी वेगवेगळ्या प्रकारची भांडी वापरली जात असत.या सर्व प्रकारच्या भांड्यांनी स्वयंपाकघरातील लाकडी कपाट सजलेले दिसायचे.थंड पाण्यासाठी प्रत्येक घराच्या अंगणात मोठा रांजण मातीच्या कट्ट्यामध्ये बसवलेला पाहावयास मिळायचा.दूरवरून पाणी आणण्यासाठी पत्र्याच्या घागरी वापरल्या जायच्या. तांब्याच्या घागरी व पिंपातील पाणी पिले जायचे.ते पाणी आरोग्यास हितकारक ठरायचे. तांब्याच्या हंड्यामध्येच भात शिजवला जायचा.जुन्या काळातील हे वैभव सध्या वापराविना अडगळीत पडल्याचे पाहावयास मिळत आहे. अनेक घरांतून या भांड्यांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे.ग्रामीण भागात अनेक घरांमध्ये जुन्या काळातील तांब्या-पितळेची भांडी अद्यापही अशा पद्धतीने जतन करून ठेवली आहेत.

**वस्तुसंग्रहालयामधून मागणी**

अशा जुन्या भांड्यांना अनेक वस्तुसंग्रहालयांमधून मागणी होत आहे.मात्र,अनेक लोकांनी ही भांडी जतन करण्यालाच अधिक प्राधान्य दिले आहे.

# शब्दगंध साहित्य संमेलनाचे उद्घाटन पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते होणार



अहिल्यानगर : महाराष्ट्र राज्य शब्दगंध साहित्य संमेलन ८ व ९ फेब्रुवारी रोजी सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयामध्ये होत असून त्याच्या उद्घाटनाचे निमंत्रण पद्मश्री पोपटराव पवार यांना आदर्श गाव हिवरे बाजार येथे जाऊन देण्यात आले. यावेळी त्यांनी निमंत्रणाचा स्वीकार केला,व हिवरे बाजार गावांमध्ये जलसंधारण, पर्यावरण, वृक्षारोपण व संवर्धन चे उत्कृष्ट काम पाहून मनाला समाधान झाले. पद्मश्री पोपटराव पवार यांनी केलेल्या कामाच्या माध्यमातून ऊर्जा व प्रेरणा मिळाली गावात सुरू असलेल्या योजनांची माहिती घेत कामांची पाहणी केली. शब्दगंध साहित्य संमेलनाचे उद्घाटन पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते संपन्न होणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिली. सावेडी कोहिनूर मंगल कार्यालय येथे होत असलेल्या शब्दगंध साहित्य संमेलन उद्घाटनाचे निमंत्रण पद्मश्री पोपटराव पवार यांना देताना स्वागत अध्यक्ष संपत बारस्कर, शब्दगंध साहित्य परिषदेचे संस्थापक सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, राजेंद्र चोभे आदी उपस्थित होते.

**१६ व्या शब्दगंध साहित्य संमेलनाचे उद्घाटन माझ्या हस्ते संपन्न होणार आहे. शब्दगंध साहित्य संमेलनाची मुहूर्तमेढ आपल्या शहरांमध्ये रुजली असून त्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. राज्यभरातून नामवंत कवी साहित्यिक लेखक उपस्थित राहत मराठी भाषा वाढविण्याचे काम केले जाते. या माध्यमातून नवीन साहित्यिक कवी निर्माण होत असतात, साहित्यिकांच्या माध्यमातून आपली परंपरा संस्कृती जोपासली जात असल्याचे मत पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले.**

# फर्दापूर जवळील ठाणा गावात अज्ञात तापाने दोन मुलांचा मृत्यू

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ७ फर्दापूर: सोयगाव तालुक्यातील ठाणा गावात अज्ञात तापाच्या साथीने आठवडाभरात दोन बालकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तापाच्या साथीने सलग दोन बालकांच्या मृत्युने ठाणा गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

आशिष रंगनाथ हातोळे (वय.११) या मुलाला तापाची लागण झाल्याने त्याला उपचारासाठी संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.मात्र उपचारा दरम्यान त्याचा आठवडाभरा पूर्वी मृत्यू झाला होता.

गौतम किशोर सुरवाडे (वय.१२) ह्या मुलालाही अज्ञात तापाची लागण झाल्याने छत्रपती संभाजीनगर येथे दोन दिवसापूर्वी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.मात्र, उपचारादरम्यान त्याचाही शुक्रवारी मृत्यू झाल्याने ठाणा गावावर शोककळा पसरली आहे.अचानक दोन बालकांच्या मृत्युने ठाणा गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.

सदर घटनेची बाब लक्षात घेता शुक्रवार (दि.७) तात्काळ आरोग्य विभागाचे साथरोग सर्वेक्षण पथक ठाणा गावात धडकले.आरोग्य अधिकारी डॉ. गितेश चावडा यांच्या आदेशाने डॉ.स्नेहल वारांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील ताप सदृश्य रुग्णांच्या रॅपिड सर्वे व रक्ताच्या तपासण्या करण्यात आल्या.मात्र,केलेल्या तपसण्यांचे रिपोर्ट हे निल आल्याने हा कोणत्या प्रकारचा ताप असू शकतो असा प्रश्न आता आरोग्य विभागापुढे पडला आहे.

यावेळी तालुका आरोग्य सहायक हिरामण दुधे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी ज्ञानेश्वर पाटील,ईश्वर निकम,आरोग्य सेवक अमोल धमके,विजय पंडित,गोपी राठोड,संतोष सोहनी,आढाव,स्वप्नील हिवाळे यांच्यासह आरोग्य सेविका,आशा सेविका यांची पथकात उपस्थिती होती.

**जवळपास दिवसभरात रॅपिड सर्वेमार्फत डेंग्यू,मलेरियाच्या जवळपास २५ तपासण्या करण्यात आल्या असून सर्व रिपोर्ट हे निल आले आहेत. इतरत्र तपासण्या करण्यासाठी रक्ताचे नमुने हे शासकीय जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात येणार आहे.**

**–ज्ञानेश्वर पाटील,प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी**

**ठाणा गावातील अज्ञात तापाच्या साथीचे गांभीर्य लक्षात घेता गावातील पिण्याचे पाणी तसेच रोजच्या वापरातील पाण्याचे नमुने घेऊन प्रयोगशाळेला पाठविण्यात आले आहे.तपासणीअंती पाण्यात काही दोष आढळून आल्यास त्यादृष्टीने उपाययोजना करू.**

**–डी.डी.सेफ,ग्रामविकास अधिकारी ठाणा – वरखेडी खुर्द ग्रामपंचायत**

# वेरूळ शिवारातील श्रीकृष्ण गोशाळेतील गाईवर बिबट्याचा हल्ला

तभा वूतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी .वेरूळ येथील श्री विद्या वामदेव तीर्थ स्वामी महाराज यांच्या टाका आश्रम अंतर्गत असलेल्या श्रीकृष्ण गोशाळेतील एका गाईवर रात्रीच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून गाईस मारले. वेरूळ शिवारात बिबट्याचा वावर वाढला असल्याने वन विभाग मात्र अनभिज्ञ अवस्थेत दिसून येत आहे. सदरील घटना ही गोशाळेच्या मागील बाजूस घडली असून या गोशाळेत एकूण ३०० हून अधिक गाई आहेत. सकाळी सात वाजेच्या सुमारास येथील गोशाळेतील कर्मचाऱ्यांना साफसफाई करत असताना मागील बाजूस मृत झालेली गाय आढळून आली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात येत आहे. यापूर्वी देखील बिबट्याच्या हल्ल्यात गाई म्हैस आणि बकऱ्यांचा फारसा पाडला होता.

काही दिवसांपूर्वीच वेरूळ शिवारातील शेकापुरी, शार्दुलवाडी, तलाववाडी, मांबापुरवाडी येथील शेत वस्तीवर बिबट्याने हल्ला करून दोन बकऱ्या तीन वासरी आणि एका म्हशीवर हल्ला करून त्यांचा देखील फाडशा पाडला होता. तेव्हा देखील वन विभागाने कुठलीही खबरदारी न घेता बिबट्याचा बंदोबस्त न करता केवळ वेळ मारून नेली असल्याने दिवसेंदिवस परिसरात बिबट्याची दहशत मोठी वाढली आहे. शिवाय सध्या वेरूळ परिसरात रात्रपाळीची वीज असल्याने शेतकरी रात्री अपरात्री गहू व अन्य पिकाला रात्री पाणी देण्यासाठी शेतात जात असल्याने त्यांच्या देखील जीवाला धोका वाढला आहे तसेच शेतावर काम करण्यासाठी मजूरही मिळेल असे झाले असल्याने या बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी ही शेतकरी वर्गातून वाढली आहे. पळसवाडी तांडा वेरूळ तांडा तलाववाडी शार्दुलवाडी आणि खुद्द वेरूळ गावात चार गोशाळा असल्याने येथे देखील हजारो जनावरे आहेत. तरी वन विभागाने तात्काळ कारवाई करून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

तसेच सदरील श्रीकृष्ण गोशाळा ही वेरूळ लेण्यांपासून अगदी हाकेच्या अंतरावर असल्याने लेणी परिसरात देखील देश-विदेशातील हजारो पर्यटक दररोज भेट देत असतात, परिणामी पर्यटकांचा जीव देखील धोक्यात येण्याची शक्यता असल्याने वनविभागाने घटनेचे गांभीर्य ओळखून या बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सतीश फुलारे यांनी केली आहे.

# रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना वही व पेन चे वाटप

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.७, त्यागमूर्ती माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सिल्लोड शहरातील नगर परिषद प्रशालेच्या विद्यार्थ्यांना वही व पेन चे वाटप युवानेते, माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्याहस्ते करण्यात आले. फेस ऑफ आंबेडकर राईट मुव्हमेंट ( फॅम ) यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



प्रारंभी युवानेते तथा माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर व मान्यवरांच्या हस्ते त्यागमूर्ती माता रमाबाई भीमराव आंबेडकर तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी युवानेते अब्दुल समीर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित केले. माता रमाबाई यांच्या जयंती निमित्त आयोजित उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. आ. अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने उभारण्यात येत असलेली नगर परिषद शाळेच्या इमारतीचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच ही ईमारत कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती अब्दुल समीर यांनी दिली. आ. अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहे त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीवर भर द्यावा असे अब्दुल समीर म्हणाले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम, शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, मेघा शाह, अरुणा राजपूत, आशा कांबळे, नॅशनल सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, माजी उपनगराध्यक्ष संजय आरके, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, तालुकाप्रमुख मारुती पा. वराडे, माजी नगरसेवक जितू आरके, राजेंद्र जमधडे, धम्मा दांडगे, संजय मुरकुटे, युवासेनेचे शिवा टोम्पे, फहिम पठाण, सुनील पांडुरंग दुधे, महेश पाटील, जगन्नाथ कुदळ, भावराव दुधे, अनुप पाटील यांच्यासह योगेश सोनवणे, मुख्याध्यापक नारायण चव्हाण ,सय्यद अस्लम , जावेद दळवी , संजय राठोड , जयश्री देवरे , योगेश्वरी पाटील , जेबा बागवान,मनीषा जैस्वाल , रामेश्वर काळे , संगीता दौड, संदेश पाईक, सुरेश खरात, संतोष गिरनारे,माकांत बोराडे, पवन ठाकूर,आशिष तायडे, बारकू आरके,राजेंद्र आहिरे, अरविंद गवई,अरुण दांडगे, विठ्ठल सिरसाट, मनोहर अपार आदींची उपस्थिती होती.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी श्रमसंस्कार शिबिर संपन्न

नगर (प्रतिनिधी) : डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळदघाट, अहिल्यानगर अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत नांदगाव, ता. जिल्हा अहिल्यानगर येथे संपन्न झाले. या शिबिरात ग्रामस्वच्छता, डिजिटल साक्षरता अभियान, वृक्षसंवर्धन, रक्तक्षय तपासणी, बालविवाह प्रतिबंध जनजागृती, गाव रस्ते व नदी दुरुस्ती, व्यक्तिमत्त्व विकास व्याख्यान, शेतीविषयक मार्गदर्शन आणि नवमतदार जनजागृती असे विविध उपक्रम राबविण्यात आले.




शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रा. डॉ. महाविरसिंग चौहान (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण अधिकारी), डॉ. गोकुळदास गायकवाड (संचालक, ई.टी.आय, रा.से.यो., अहिल्यानगर), कृषिभूषण सुरशिंगराव पवार, गावाचे सरपंच श्री. सखाराम सरक, उपसरपंच नाथाभाऊ सरक, कायदेतज्ज्ञ ड. वैभव आघाव, जागतिक कुस्तीपटू श्री. राजकुमार आघाव, कृषी सल्लागार डॉ. सतीश सोनवणे, तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डॉ. महाविरसिंग चौहान यांनी युवकांनी निडर, स्पष्टवक्ते आणि सामाजिक जाणीव असलेले व्हावे असा संदेश दिला. प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शेतीशी संबंधित आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करावा आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे सांगितले.

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एस. दांगडे यांनी शिबिरातील उपक्रमांची माहिती दिली. या सात दिवसांत श्रमदान, पथनाट्य, प्रभात फेरी, नवमतदार जनजागृती, डिजिटल साक्षरता अभियान यांसारखे उपक्रम राबविण्यात आले. तसेच डॉ. अशोक घोरपडे, श्री. प्रकाश लोखंडे, श्री. अक्षय पावडे, कृषिभूषण श्री. विष्णू जरे, कृषीरत्न सौ. क्रांती चौधरी, कायदेतज्ज्ञ ड. वैभव आघाव, डॉ. विजय पाटील यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

या शिबिरासाठी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय दादा विखे पाटील (मा. खासदार, अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघ) यांनी शुभेच्छा दिल्या.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (३४) प्रार्थना

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्। महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।१।

अर्थः- हे वत्सल मातृभूमे, मी तुला सदैव नमस्कार करतो. हे हिंदू भूमे, तू माझे सुखाने पालनपोषण केलेले आहेस. हे महामंगलमयी पुण्यभूमे, तुझ्यासाठी- माझा देह समर्पण होवो. मी तुला पुन्हा पुन्हा वंदन करतो.

।। भारत माता की जय ।।

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# बदलती जीवनशैली आणि तिचे परिणाम : मधुमेह व हृदयविकार विषयावर जैन टॅग तर्फे विशेष उदबोधनाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जैन टॅग या ग्रुप तर्फे आधुनिक जीवनशैलीमुळे मधुमेह (ऊळरलशींशी) आणि हृदयविकार (क्शरीीं ऊळीशरीशी) यांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. यासाठी मुख्यतः अयोग्य आहार, शारीरिक निष्क्रियता, ताणतणाव, व्यसन आणि अपर्याप्त झोप हे घटक जबाबदार आहेत मधुमेह व हृदयविकार याची लक्षणे कशी ओळखावी या विषयावर दिनांक १० फेब्रुवारी रोजी उदबोधनाचे आयोजन तापडिया नाटय मंदिर येथे संध्याकाळी ७ वाजता करण्यात आले आहे. यावेळी डॉ.मुकुंद बजाज हृदयरोगतज्ञ, डॉ.प्रियंका कल्याणकर त्वचारोगतज्ञ, डॉ.प्रविण कल्याणकर मधुमेहतज्ञ, डॉ.शिल्पा जोशी मुबंई आहारतज्ञ, डॉ.अर्चना सारडा मधुमेह तज्ञ हे उदबोधन करणार आहेत. या कार्यकमाची सर्व स्तरातील बांधवांना प्रवेश ठेवण्यात आला आहे. या कार्यकमासाठी स्व.श्री.सुरेशकुमार नेमीचंद अजमेरा यांच्या स्मरणार्थ सौ. सोनाली आनंद पाटणी, अमन ग्रुप, जडगांववाला ज्वेलर्स, स्व.सौ.संगीता रमेश कासलीवाल कांबीवाला यांच्या स्मरणार्थ दिलीप इलेक्ट्रीकल यांच्या सहकार्याने हा कार्यकम आयोजीत करण्यात आला आहे. तरी सर्व स्तरातील बांधवांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन जैन टॅगच्या अध्यक्षा श्वेता कासलीवाल, पुर्वा कासलीवाल, जयश्री लोहाडे, श्वेता गंगवाल, प्रोजेक्ट चेअरमेन दिपीका बडजाते, मोनिका चांदीवाल, रचना पहाडे, पुजा झांजरी, डॉ.याशिका पांडे, सिमा बडजाते, सारिका बडजाते,जैन टॅगच्या संस्थापिका अनुपमा दगडा, दिपीका बडजाते, जैन टॅगच्या सदस्या यांनी केले आहे. अशी माहिती प्रसार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# ओला इलेक्ट्रिकने रोडस्टर एक्स सीरीज केली लाँच

छत्रपती संभाजीनगर ७ फेब्रुवारी २०२५ : भारतातील सर्वात मोठी प्युअर-प्ले ईव्ही कंपनी ओला इलेक्ट्रिकने आज रोडस्टर एक्स सीरीज लाँच करून ईव्ही मोटरसायकल सेगमेंटमध्ये प्रवेश केला आहे. या मोटरसायकली प्रभावी कामगिरी आणि एक रोमांचक रायडिंग अनुभव देतात. कंपनीच्या स्केलेबल मोटरसायकल प्लॅटफॉर्मवर बनवलेली, पूर्णपणे नवीन रोडस्टर एक्स सीरीज रोडस्टर एक्ससाठी ७४,९९९, रोडस्टर एक्स+ ४.५ केडब्ल्यूएच साठी १,०४,९९९ आणि रोडस्टर एक्स+ ९.१ केडब्ल्यू एच (४६८० भारत सेलसह) साठी १,५४,९९९ च्या सुरुवातीच्या किमतीत सादर केली जात आहे. ही ५०१ किमी/चार्जची अतुलनीय रेंज देते. नवीन रोडस्टर एक्स चे २.५ केडब्ल्यूएच ३.५ केडब्ल्यूएच आणि ४.५ केडब्ल्यूएच व्हेरिएंट अनुक्रमे ७४,९९९, ८४,९९९ आणि ९४,९९९ किमतीत उपलब्ध आहेत. रोडस्टर सिरीज ३ वर्षे /५०,००० किमीच्या मानक वॉरंटीसह येते. रोडस्टर सिरीजची डिलिव्हरी मार्चच्या मध्यापासून सुरू होईल. ओला इलेक्ट्रिकचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, भाविश अग्रवाल म्हणाले, मोटारसायकली भारतातील गतिशीलतेचा पाया आहेत.

# डॉ पन्नालाल पापडीवाल यांचे निधन



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०७ :- वैद्यकीय, राजकीय, व्यापार, उद्योग तसेच धार्मिक सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य असलेले पैठण शहराचेभूषण डॉ पन्नालाल बालचंद पापडीवाल यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी आर्यानंदी कॉलनी येथील त्यांच्या राहत्या निधन झाले. त्याच्या निधनाने जैन समाजाला मोठा धक्का बसला असून मांगीतुंगी येथील भगवान ऋषभदेव यांच्या १०८ फूट मूर्ती साकारण्यात स्व डॉ पापडीवाल यांचा सिहांचावाटा होता.

पैठण येथे एक चांगले वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर ते चार वेळा नगरसेवक म्हणुन काम करणारे अभ्यासु राजकारणी,पैठण शहरात पहिला पेट्रोल पंप उभारनी, उत्कृष्ट व्यापारी, येथील जैन मंदिर ,मुनीसुवृतनाथ मंदिराचा महामंत्री म्हणुन केलेला परिसर विकास तसेच मांगीतुंगी येथील भगवान ऋषभदेव यांची १०८ फूट उंच मूर्ती साकारण्यात असलेला पुढाकार प्रवास थक्क करणारा राहीला.

साडेचार हजार फुट उंचीवरील या मूर्तीच्या निर्माणास जवळपास १९ वर्ष लागले यासाठी अत्यंत त्यागी वृत्तीने त्यांनी तन मन धनाने दिलेले संपुर्ण योगदान खूप मोठे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले संजय पापडीवाल, प्रतिष्ठित व्यापारी विजय पापडीवाल तीन मुली, सुना, नातवंडे,पतवंडे असा मोठा परिवार आहे. अयोध्यानगरी स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. डॉ पन्नालाल पापडीवाल यांच्या निधनाने पैठण शहरात शोककळा पसरली आहे.

**अहिल्यानगर नगर निगम, अहिल्यानगर**
**क्षेत्रीय पर्यटन विकास योजना वर्ष २०२४-२५**
**पुनः ई-निविदा सूचना संख्या : २३५ / वर्ष २०२४-२५**

क्षेत्रीय पर्यटन विकास योजना वर्ष २०२४-२५ पुनः ई-निविदा सूचना सं. २३५ ई-टेंडर मोड के माध्यम से ऑनलाइन बोली लगाने के लिए वर्ष २०२४-२५ को वेबसाइट http://mahaetenders.gov.in पर प्रकाशित किया गया है।

हालांकि, संबंधित को इस पर ध्यान देना चाहिए।

(माननीय आयुक्त के अनुमोदन से) हस्ताक्षर/-
नगर अभियंता
अहिल्यानगर नगर निगम,

# इंदिरा आयव्हीएफचे महाराष्ट्रातील २९वे हॉस्पिटल जालना येथे सुरू

## टीयर टू आणि थ्री शहरांमध्ये आयव्हीएफ हॉस्पिटल विस्ताराचा पुढाकार

जालना : आपल्या जीवनशैली आणि खराब आहारामुळे शरीराला खूप नुकसान झाले आहे. तसेच डायबिटीज, अधिक वय, लठ्ठपणा आणि पीसीओएसमुळे अनेक महिलांना वंध्यत्वाचा सामना करावा लागतो. यापैकी अनेक रुग्णांना या समस्येबद्दल माहितीही नसते. अनेक दांपत्ये नैसर्गिक गर्भधारणा आणि सामान्य उपचारांमध्ये यश न मिळाल्याने हार मानतात, परंतु आधुनिक उपचारांमुळे वंध्यत्वाचे उपचार शक्य आहेत. संतान सुखापासून वंचित दांपत्यांना उच्चस्तरीय उपचार सेवा प्रदान करण्यासाठी निःसंतानतेच्या उपचाराची देशातील सर्वात मोठी फर्टिलिटी चेन इंदिरा आयव्हीएफने महाराष्ट्रातील फर्स्ट फ्लोर, रामा आर्केड जालना येथे आधुनिक हॉस्पिटलचे उद्घाटन केले आहे. हॉस्पिटलचे उद्घाटन प्रमुख पाहुने जिल्हाशल्यचिकीत्सक जालना डॉ. आर.एस. पाटील, क्लास वन मेडिकल



ऑफिसर हॉस्पिटल ट्रेनिंग सेंटर डॉ. बी.जे. घोलप, क्लास वन एनेस्थेटिस्ट डॉ. पी.एम. कुलकर्णी, पोलीस निरीक्षक संदीप एस. भारती, सीनियर एक्झिक्युटिव डायरेक्टर आणि सेंटर हेड इंदिरा आयव्हीएफ छत्रपती संभाजीनगर डॉ. धोंडीराम भारती आणि जालना हॉस्पिटल हेड डॉ. स्वाती सानप (थोरवे) यांनी फीत कापून केले. हे ग्रुपचे महाराष्ट्रातील २९वे हॉस्पिटल आहे.

इंदिरा आयव्हीएफ ग्रुपचे सीईओ आणि सह-संस्थापक डॉ. क्षितिज मुर्डिया यांनी सांगितले की, महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सक्षम मानले जाते, परंतु अद्यापही येथील दुर्गम भागांमध्ये निःसंतानता आणि तिच्या उपचाराबद्दल जागरूकता खूप कमी आहे. यासाठी इंदिरा आयव्हीएफ ग्रुप सतत प्रयत्न करत आहे. ग्रुपच्या अत्याधुनिक हॉस्पिटलमध्ये एकाच छताखाली सर्व निःसंतानता उपचार सुविधा उपलब्ध असल्याने दांपत्यांना दूरच्या शहरांमध्ये प्रवास करावा लागणार नाही. इंदिरा आयव्हीएफकडून उपचार घेतल्यानंतर आतापर्यंत एक लाख साठ हजारांहून अधिक दांपत्यांना आयव्हीएफ प्रेग्नेंसी झाली आहे. ग्रुपच्या देश-विदेशातील १६० हून अधिक लोकेशन्समध्ये अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज आयव्हीएफ हॉस्पिटल्स चालवले जातात. भारतातील वैद्यकीय पर्यटन क्षेत्र २०२४ ते २०३४ पर्यंत १७.२० टक्के सीएजीआरने वाढण्याची अपेक्षा आहे, जे ५०,६७०.५ मिलियन अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त होईल. आमचा अंदाज आहे की एआरटी उपचार निकट भविष्यकाळात वैद्यकीय पर्यटनात आपला वाटा वाढवेल. मुख्य अतिथी सिव्हिल सर्जन जालना डॉ. आर.एस. पाटील यांनी सांगितले की, निःसंतानता सारख्या गंभीर विषयावर लोक बोलत नाहीत, परंतु इंदिरा आयव्हीएफने हा मुद्दा जनतेपर्यंत पोहोचवला आणि उपचारांना सोपे केले आहे. दांपत्यांना संतान सुखाच्या दिशेने नेण्यासाठी ग्रुपला शुभेच्छा देतो.

सीनियर एक्झिक्युटिव डायरेक्टर आणि सेंटर हेड इंदिरा आयव्हीएफ छत्रपती संभाजीनगर डॉ. धोंडीराम भारती यांनी सांगितले की, भारतात प्रत्येक ६ पैकी १ दांपत्य निःसंतानतेच्या समस्येने प्रभावित आहे, परंतु उपचार पर्यायांची माहिती नसल्यामुळे केवळ दोन टक्के दांपत्येच आयव्हीएफ उपचार तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकतात. इंदिरा आयव्हीएफच्या जालना हॉस्पिटलमध्ये निःसंतानतेचे कारण जाणून घेण्यासाठी सर्व प्रकारच्या तपासण्या आणि उपचारांची आययूआय, आयव्हीएफ, इक्सी, लेझर असिस्टेड हॅचिंग, ब्लास्टोसिस्ट कल्चर, पीजीटी, क्लोज्ड वर्किंग चेंबर यासारख्या तंत्रज्ञान उपलब्ध आहेत. इंदिरा आयव्हीएफमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इतर आधुनिक तंत्रज्ञानांचा उपचारांमध्ये समावेश करण्यात आला आहे, जेणेकरून दांपत्यांना यश मिळण्याची शक्यता अधिक राहील.

Adivasi Devmogara Education Society's
**D P GAVIT AYURVED COLLEGE & HOSPITAL**
**Pathrai Tal. & Dist. Nandurbar**
Ph-7588737802 E-mail: 2024ayu0864@gmail.com

**Walk In Interview**

Application are invited on plain paper along with all necessary copy of certificate from the eligible candidate for the following post. Qulification and experience as per **MUHS** notification no 40/2016 Direction No 01-2017

| Sr.No | Subject | Professor | Associate Professor (Reader) | Assistant Professor/ Lecture |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | | | 1 (Open) |
| 1 | Samhita And Siddhanta | --- | 1 (Open) | 1 (Open), 1(SC) |
| | Sanskrit | --- | --- | 1 (Open) |
| 2 | Rachana Sharir | ---- | 1 (Open) | 1 (Open) |
| 3 | Kriya Sharir | --- | 1 (Open) | 1 (Open) |

(In the Principal row, "1 (Open)" is printed under the heading "Vacant post".)

**Note:-** For detailed information about post, Qualification and conditins please visit **MUHS**, website:www.muhs.ac.in Application along-with attested copies of all relevant Certificates must reach to the college on or before:23/02/2025

**Sd/-** **Secretary** **Sd/-** **Chairman**

## अग्रलेख...

# ...म्हणून वास्तव स्पष्ट झाले!

संसद असो अथवा कोणत्याही राज्याची विधिमंडळे, या सभागृहांतील सदस्यांना निर्भयपणे बोलण्याचा आणि आपली मते मांडण्याचा निःसंशय अधिकार असतो. सभागृहात काय बोलावे आणि काय बोलू नये याचे तारतम्य बाळगण्याचे कर्तव्य मात्र त्यांना सांभाळावे लागते. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट?पतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक ठरावावरील चर्चेत बोलताना विरोधी पक्षनेत्यासारख्या जबाबदार आणि गंभीर पदावरील व्यक्तीस वारंवार त्याचे स्मरण करून देण्याची वेळ लोकसभा सभापतींवर यावी आणि तरीही आपले तथ्यहीन वक्तव्याचे घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न विरोधी पक्षनेत्याकडून होत राहावा, हे अनाकलनीय होते की देशाची दिशाभूल करण्यासाठी जाणीवपूर्वक सुरू असलेल्या प्रयत्नांचा भाग होते, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. भारताच्या भूभागावरील चिनी अतिक्रमण, अमेरिकेच्या राष्ट?ाध्यक्षांकडून पंतप्रधानांस आलेले आमंत्रण, गरिबी आणि इतर अनेक विषयांवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे प्रदीर्घ भाषण सुरू होते, तेव्हा विरोधी बाकांवरील सदस्य बाके वाजवत असले, तरी या पदावरील व्यक्तीला आपल्या जबाबदारीचे भान आहे की नाही, याची शंका विरोधकांतील बुजुर्गांच्या मनात नक्कीच आली असेल. कोणत्याही एखाद्या गंभीर विषयावर विशेषतः आंतरराष्ट?ीय संबंधांसारख्या नाजूक मुद्यावर बोलताना सभागृहात त्याचे काही ठोस संदर्भ सादर करावे लागतात, याची आठवण लोकसभा सभापती आणि सत्ताधारी पक्षाचे अनेक नेते वारंवार करून देत असतानाही राहुल गांधी यांच्या अनेक विधानांसाठी कोणतेही ठोस संदर्भ सभागृहात सादर न केल्याने, त्यांच्या हेतूविषयी शंका उपस्थित होणे साहजिक आहे.

महाराष्ट?ातील विधानसभा निवडणुकांच्या निकालाबाबत असो, देशाच्या सीमावर्ती भागातील संवेदनशील बाबींवर बोलणे असो, संरक्षणासारख्या मुद्यावर बोलणे असो किंवा परराष्ट? नीतीसंबंधीच्या मुद्यावर बोलणे असो, त्यासंबंधीचे ठोस पुरावे सोबत असणे व त्यांची मागणी झाल्यास ते सादर करणे ही सभागृहाच्या कामकाजाची रीत असते. राहुल गांधी यांनी त्याची फारशी दखल न घेतल्याने, सभागृहातील कामकाजाच्या संकेताबाबत ते गंभीर आहेत का किंवा किती गंभीर आहेत, याचे स्पष्ट उत्तर त्या दिवशी मिळाले. सभागृहाचे सदस्य नसलेल्या व्यक्तीचा नामोल्लेख व त्याच्यासंबंधीची चर्चा न करणे हादेखील सभागृहातील सभ्यतेचा एक संकेत असतो. राहुल गांधी यांना त्याचीही जाणीव सभापतींनी करून द्यावी, हे विरोधी पक्षनेतेपदाच्या प्रतिष्ठेस साजेसे निश्चितच नाही. असे असले, तरी सभागृहात बोलणाऱ्या प्रत्येक सदस्याने उपस्थित केलेल्या मुद्याची दखल सत्ताधाऱ्यांस उत्तरादरम्यान घ्यावी लागते. यामुळेच राहुल गांधींपासून संजय राऊत यांच्यापर्यंत ज्या सदस्यांनी निश्चित व ठोस दाखले न देता केलेल्या मुद्यांची दखल सरकारकडून घेतली गेली. अन्यथा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या चर्चेवरील उत्तरात देशाच्या भूतकाळातील कारभाराचा पाढा वाचून काँग्रेसच्या एकूण कार्यशैलीचा पंचनामा करण्याची संधी गमवावी लागली असती. राहुल गांधी यांनी केलेल्या विधानांमुळे पंतप्रधानांना १० वर्षांपूर्वीच्या देशाच्या एकूण स्थितीचा तपशीलवार मागोवा घेण्याचे निमित्त साधता आले, ते देशाच्या दृष्टीने उपयुक्त ठरले आहे. देशात गरिबी दूर करण्याच्या केवळ घोषणा होत होत्या. वर्षानुवर्षे 'गरिबी हटाओ'चे नारे दिले जात होते. पण, गेल्या १० वर्षांत देशातील २५ कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेतून बाहेर पडली, याचा पुनरुच्चार करण्याची संधी राहुल गांधींच्या त्या भाषणामुळेच पंतप्रधानांना प्राप्त झाली. काँग्रेसच्या मुखवट्याआडचा चेहरा उघड करण्याची संधी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी याआधीही अनेकदा पंतप्रधानांना दिली आहे. सभागृहात आणि सभागृहाबाहेरही पंतप्रधानांनी काँग्रेसी नीतीचा वारंवार खरपूस समाचार घेतला आहे. गेल्या १० वर्षांत देशातील चार कोटी गरिबांच्या डोक्यावर घराचे छप्पर लाभले आहे आणि सामान्य महिलांकरिता १२ कोटींहून अधिक शौचालय सुविधांचा आश्वस्त लाभ मिळाला आहे. गरिबांच्या नावाने राजकारण करणारे जे नेते आपल्या जीवनशैलीला आलिशान बनविण्यासाठी सरकारी सुविधांचा गैरवापर करतात, त्यांच्या डोळ्यातही या निमित्ताने पंतप्रधानांनी अंजन घातले; ते योग्य झाले. अशा उपचारामुळे डोळे उघडून आसपासच्या वस्तुस्थितीकडे पाहण्याची व बदल जाणून घेऊन त्याचा मोकळेपणाने स्वीकार करण्याची प्रवृत्ती जेव्हा विरोधकांमध्ये जन्मास येईल, तेव्हा त्या जाणिवा प्रगल्भ झाल्या असे म्हणता येईल. राष्ट?पतींच्या अभिभाषणातील मुद्यांची 'तेच ते' म्हणून खिल्ली उडविणाऱ्या राहुल गांधींमुळे भूतकाळातील ज्या अनेक बाबींच्या आठवणींची उजळणी झाली, त्यात भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित होणे अपरिहार्य होतेच. दिल्लीतून पाठविल्या जाणाऱ्या प्रत्येक रुपयामागील केवळ १५ पैसे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतात, या हातचलाखीचे आश्चर्य माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी उघडपणे व्यक्त केले होते. अलिकडे सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांना थेट हस्तांतरण योजनेतून केवळ योजनेच्या लाभास पात्र असलेल्या व्यक्तींच्याच खात्यात जमा होणाऱ्या मदतीच्या निधीचा अनुभव असल्याने दोन सत्ताकाळांमधील फरकाचा तुलनात्मक आढावा घेणेही यामुळेच देशातील जनतेस शक्य झाले आहे. केवळ या योजनेमुळे सरकारच्या तिजोरीतून अयोग्य हातात जाणारी तीन लाख कोटींची बचत झाली आहे, हे राहुल गांधींच्या भाषणामुळे पंतप्रधानांकडून स्पष्ट झाले, याकरिता राहुल गांधींचे आभार मानायलाच हवेत. काँग्रेसी सत्ताकाळात वर्तमानपत्रांचे मथळे लाखो आणि कोट्यवधींच्या घोटाळ्यांच्या बातम्यांनी सजलेले असत. आता असे मथळे तर अदृश्य झालेच; पण घोटाळ्यांना थारादेखील न राहिल्याने देशाची लाखो-कोटी रुपयांची बचत झाली, हा मुद्दाही पंतप्रधानांना अधोरेखित करावा लागला. राहुल गांधी यांनी भाषणात तथ्यहीन वक्तव्ये टाळली असती, तर कदाचित पंतप्रधानांच्या उत्तराची दिशा भूतकाळकेंद्रित न राहता केवळ भविष्यवेधी राहिली असती, यात शंका नाही. म्हणूनच, विरोधी पक्षनेते पदासारख्या जबाबदार पदावरून केलेल्या तथ्यहीन वक्तव्यांची दखल घेऊन सत्ताधाऱ्यांना त्याची उत्तरे द्यावी लागली, तरी त्या निमित्ताने उघड होणाऱ्या बाबींच्या कडवट मात्रा मात्र विरोधकांना निमूटपणे घशाखाली घालून गिळाव्या लागतात, ते कसे, हे या चर्चेदरम्यान अनेकांनी अनुभवले असेल. घोटाळेविरहित कारभार, गरिबांच्या कल्याणाच्या आणि थेट लाभाच्या योजनांची नीती यामुळे सरकारी तिजोरीतून वाचलेला पैसा कल्याणकारी योजनांकरिता वापरण्याच्या मोदी सरकारच्या नीतीचा दाखला देताना पंतप्रधानांनी केलेला 'शिशमहल'चा उल्लेखही बराच बोलका ठरला आहे.

जनऔषधी योजना, स्वच्छता अभियान, नळाद्वारे पाणीपुरवठा यासारख्या योजना केवळ सरकारकडून लोकानुनयासाठी राबविल्या गेलेल्या नाहीत. या योजनांमुळे घरोघरीच्या अर्थसंकल्पातील हजारो-कोटींचा खर्च वाचला आहे. मिळालेल्या आरोग्यदायी लाभामुळे कुटुंबांचा आरोग्यावरील खर्च कमी झाल्याने जनतेची १२ हजार कोटींची बचत झाली, हे लोकसभेच्या मंचावरूनच स्पष्ट केले. नळाद्वारे पाणी योजनेमुळे प्रत्येक लाभार्थी कुटुंबाची सरासरी ४० हजार रुपयांची बचत झाली, तर जनऔषधी केंद्रांमुळे देशातील जनतेच्या औषधांवरील खर्चात ३० हजार कोटींची बचत झाली. मोफत धान्य योजनेमुळे लाभार्थी कुटुंबांच्या होणाऱ्या सुमारे ३० हजार कोटींच्या बचतीमुळे त्यांचे जीवनमान उंचावणे शक्य होते, असा सरकारी खाक्याला याआधी कधीही न शोभलेला विचार देशासमोर स्पष्ट झाला. राहुल गांधी अनेकदा संदर्भहीन बोलतात, त्यांच्या वक्तव्यात तथ्यांचा अभाव असतो आणि 'ठोकुनि देतो' ही त्यांच्या वक्तव्याची शैली असते, असे म्हटले जाते. पण कोणाच्याही अशा अभावपूर्ण वक्तव्यांमुळे वास्तवाचे चित्र अधिक ठळकपणे स्पष्ट होण्यास मदतच होत असते, हे संसदेतील चर्चेच्या निमित्ताने स्पष्ट झाले. १० वर्षांपूर्वीच्या घटनांकडे बारकाईने पाहताना मनाला क्लेश होतात, असे पंतप्रधान मोदी म्हणाले, तेव्हा त्यांचे भाषण ऐकणाऱ्यांपैकी अनेकांनी त्याच्याशी सहमती व्यक्त केली असेल. राहुल गांधी यांच्यासारखा नेता सभागृहात असावयास हवा, असे अनेकांस वाटते, ते बहुधा त्यामुळेच असावे.

## जीवन जिज्ञासा

प्राचार्य प्र. श्री. डोरले

# महाभारत ते भारत (१२)

महाभारतातील शांतिपर्वात, राजधर्माच्या विवेचनात राजधर्माचे नीट पालन होण्यासाठी दंडनीतीचे पालन कसे आवश्यक आहे. त्यामुळे प्रजारक्षण, राष्ट्ररक्षण आणि धर्मरक्षण कसे होते, याचे विस्तृत विवेचन भीष्म पितामहांनी नवनिर्वाचित राजा युधिष्ठिराला केले आहे. ते म्हणतात, ''हे राजन! जो राजा दंडनीतीचे नीट पालन करतो तोच आपली प्रजा, राष्ट्र धर्म याचे संरक्षण करू शकतो. राजदंडाचे भय जर नसले (आजच्या परिभाषेत कायद्याचा धाक जर नसला) तर 'मात्स्यन्याय' म्हणजे 'मोठ्या माशाने लहान माश्याला खाणे' प्रारंभ होतो. जे सबल आहेत ते दुर्बलांचा सहजपणे विनाश करतात, गुराखी नसलेल्या पशूंच्या कळपाप्रमाणे लोकसमूहाची अवस्था होते. बलवान लोक सामान्य लोकांच्या द्रव्यांचा अपहार करू लागतात. (खंडणी वसुली) दुष्ट प्रवृत्तीचे, दांडगट मनोवृत्तीचे लोक इतरांची स्त्री, पुत्र, द्रव्य, परिहार, वाहने, वस्त्र, अलंकार यांचे अपहरण करू लागतात. कोणावरही कुणाचा अधिकार राहत नाही. या प्रकारे सर्वत्र अराजकाची अवस्था निर्माण होते. लक्षात ठेव, अराजकाच्या अवस्थेत असलेला समाज, राष्ट्र हे सहजपणे शत्रूच्या विविध आक्रमणाचे भक्ष्य बनतात.'' (महाभारत - राजधर्म पर्व अ. ६८ वा) महाभारतात वर वर्णन केलेल्या अराजकीय परिस्थितीचा अनुभव कमी-अधिक प्रमाणात, आजचा अपवाद सोडला, तर उत्तर प्रदेश, बिहार, काही अन्य प्रांत म्हणजे काश्मीर, बंगाल या प्रांतातील जनतेने घेतला आहे की नाही? याचे महत्त्वाचे कारण म्हणजे स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी, घराणेशाहीसाठी, स्वार्थासाठी, तो साधण्यासाठी आपल्या सोयीने वापरल्या जाणाऱ्या तुष्टीकरण, सेक्युरिझम या संकल्पनांचा वापर करणाऱ्या राष्ट्रविघातक मनोवृत्ती असलेल्या लोकांच्या हाती सत्तेचे सुकाणू होते. त्याचा परिणाम म्हणून भारताची टोकाशाही अधिष्ठित राज्य नौका भरकटली होती. तिचे अधिष्ठानच बदललेले होते. एका राजकीय विचारवंताने त्याचे बदललेल्या स्वरूपाचे केलेले विदारक वर्णन मागील लेखात आपण पाहिलेच आहे. तसे पुन्हा होऊ नये यासाठी जनशक्तीने अखंड सावधान राहणे ही काळाची गरज आहे.

### शक्तीची उपासना हाच एकमेव मार्ग

महाभारतात राष्ट्र, स्वधर्म, समाज, संस्कृती, स्त्री यांचे रक्षण कसे करावे, याचे कायमस्वरूपी उपयोगात पडेल अशा प्रकारचे मार्गदर्शन केले आहे. भगवद्गीतेचे उदात्त तत्त्वज्ञान लोकांनी ऐकले. कारण गीता सांगणाऱ्या भगवान श्रीकृष्णाच्या हाती, कोणत्याही अधम वृत्तीच्या, दुष्ट मनोवृत्तीच्या पुरुषाचा कंठनाल छेदणारे लखलखीत धारेचे सुदर्शन चक्र होते. समाजातील, कोणत्याही कुटुंबातील गृहलक्ष्मीचे कुलवधूच्या पातिव्रत्याचे संरक्षण कसे करावे आणि त्याच्यावर हात टाकणाऱ्या कामांधाचा हात मुळापासून कसा उखडून फेकावा, याचे प्रात्यक्षिक महाभारताने भीमाच्या रूपाने मांडले आहे. तो आदर्श डोळ्यांसमोर ठेवून शक्तीची उपासना करणारे युवकच 'लव्ह जिहाद' थांबवू शकतात. निषेध, ठराव, मोर्चे, आंदोलनांनी असे अत्याचारी ठिकाणावर येणे कधीही शक्य नसते. शाश्वत जीवन मूल्यांसाठी एक विरुद्ध अनेकांशी बेडरपणाने युद्ध करणारा अभिमन्यू हा महाभारताचा आदर्श युवक आहे. त्याचा वारसा चालविणारे वारसदार ही आजच्या भारताची गरज आहे. भारतीय संस्कृतीत मातृशक्तीला, नारीशक्तीला प्रत्यक्ष शक्तीचा म्हणजे दैवी शक्तीचा अवतार मानले आहे. ती एक प्रेरणास्रोत आहे. तो स्रोत अत्यंत दाहक आणि लाव्हा रसाप्रमाणे तप्त आहे. त्याच्या तडाख्यात जे सापडेल त्याचे अस्तित्वच नष्ट करण्याचे स्फोटक सामर्थ्य त्याच्यात आहे. महर्षी वाल्मीकिंनी रामायणात सीतेच्या रूपाने तो प्रकट केला. त्या ज्वालामुखीच्या लाव्हा रसात 'रावणशाही' नष्ट झाली. महाभारतात महर्षी व्यासांच्या दिव्य प्रतिभेतून द्रौपदीच्या रूपाने तो प्रकटला आणि दुःशासनाच्या रक्ताने माखल्याशिवाय मी वेणी घालणार नाही, या दाहक प्रतिशोधाच्या अखंडपणे तेवत राहणाऱ्या ठिणगीचा वणवा होऊन कुरुक्षेत्र घडले. धृतराष्ट्री मनोवृत्ती अकरा अक्षौणी सैन्यासह पूर्णपणे नष्ट झाली. आजही अंतराळात दाहीर राजाच्या कन्यापासून तो काश्मीर पंडितांच्या कन्यापर्यंतच्या बलात्कारांच्या वेदानामयी किंकाळ्यांचे अस्फुट ध्वनी तरंगत आहेत. त्यांचे आत्मे आजही भीमाचा वारसा चालविणारा कुणीतरी 'भारतात' जन्माला येईल आणि या कामांधांच्या रक्ताने आमच्या आत्म्याच्या मुक्ततेसाठी त्यांच्या रक्ताने आमच्या नावे 'तर्पण' करील. या अभिलाषेने अतृप्त मानाने फिरत असतील; पण लक्षात कोण घेतो?

शक्तीच्या सामर्थ्यावर संघटित समाजजीवन ही आपल्या सनातन वैदिक संस्कृतीची अनादिपरंपरा आहे. 'शापादपि-शरादपि' हे त्याचे व्यावहारिक स्तरावरील घोषवाक्य आहे. वैचारिक, तात्त्विक, बौद्धिक स्तरावर म्हणाल, तर त्याही स्तरावर वादाच्या रूपाने आम्ही संघर्षास तयार आहोत. जो संघर्ष वैदिक संस्कृतीने कुमारील भट्ट, आद्य शंकराचार्यांच्या माध्यमातून केला. शारीरिक बलाच्या रूपाने म्हणाल तर इ. स. सहाव्या शतकापासून तो कारगिल, बांगलादेश मुक्तीपर्यंत आपण संघर्षरतच आहोत. पण, अद्याप हा संघर्ष संपलेला नाही. कारण कोणत्याही अनैसर्गिक फाळणीचा परिणाम हा कुरुक्षेत्रावरच ठरत असतो आणि तो एकतर पांडव राहतील, नाही तर कौरव याच पद्धतीने संपत असतो. यात युधिष्ठिराच्या सदिच्छेला 'हिंदू-मुस्लिम भाई भाई'च्या घोषणांना तसेच 'ईश्वर अल्ला तेरो नाम' या मृगजळी सर्वधर्म समानसारख्या भंपक आणि ठिसूळ तत्त्वज्ञानाला काहीही अर्थ नसतो. हे कटू असले तरी सत्य आहे. महाभारतात अधोरेखित झालेले, प्रत्ययाला आलेले हे 'सत्य' आपण नाकारले. त्याची किंमत आजही आपण देतोच आहोत. या कटू सत्याची जाणीव बौद्धिक स्तरावर, इतिहासाच्या प्रदीर्घ वाटचालीचा, हिंदुत्वाचा, भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यासावर आधारित निष्कर्ष स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी सन १९३८ सालीच पं. जवाहरलाल नेहरूंना लिहिलेल्या एका पत्रात स्पष्टपणे कळविला होता की, हा हिंदू आणि मुस्लिम, हिंदुस्तान आणि पाकिस्तान असा संघर्ष नाही तर 'इट इज द कॉन्फ्लिट बिटवीन टु आयडॉलॉजीज' त्यामुळे त्या एकत्र नांदूच शकत नाही. त्यांच्यात अखंड संघर्ष होतच राहणार. तो संघर्ष मिटविण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे एक तर 'अखंड हिंदुस्तान' किंवा 'अखंड पाकिस्तान.'

वि. दा. सावरकरांचा अभ्यासपूर्ण आणि तर्कशुद्ध सल्ला पाकिस्तान, जमात-ए-इस्लामी, बांगलादेशातील, भारतातील मुल्ला-मौलवींना पटला आहे. ते 'त्या' दृष्टीने कामाला लागले आहेत; आणि आम्ही?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

संजय रामगिरवार

# फोर्ट विलियम नव्हे, विजय दुर्ग!

'नावात काय आहे?' असा प्रश्न जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपिअरला भलेही पडला असेल, पण भारतीयत्व जपणाऱ्या विद्यमान केंद्र सरकारच्या दृष्टीने हा कोट्यवधी भारतीयांच्या मानबिंदूचा, संस्कृतीचा, सद्भावनेचा आणि आपलेपणाचा प्रश्न आहे. बुधवारी, भारतीय लष्कराच्या ईस्टर्न कमांडचे मुख्यालय 'फोर्ट विलियम'चे नाव बदलून 'विजय दुर्ग' ठेवण्यात आले आहे. भारतीय परंपरा, लष्करी अभिमान आणि स्वदेशी अस्मितेला प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने हा क्रांतिकारी बदल करण्यात आला, हे लक्षात घेतले पाहिजे. त्याचवेळी काँग्रेस पक्षाच्या प्रदीर्घ सत्ताकाळात तो झाला नाही, हेही विशेषत्वाने येथे नमूद केले पाहिजे. ब्रिटिशांचा राजा विलियम तृतीयच्या नावे १७८१ मध्ये उभारलेली ही वास्तू त्यांच्या राजवटीच्या लष्करी संरचनेचा भाग होती. पुढे भारतीय सेनेच्या पूर्वी कमांडचे ते मुख्यालय झाले.

कोलकाता येथील या फोर्ट विलियमचे नाव आता विजय दुर्ग ठेवण्यात झाले आहे. असे करण्यामागचे कारण भारताच्या लष्करी परंपरा आणि संस्कृतीला चालना देणे आणि त्याचा वारसा जपणे असा आहे. ब्रिटिश राजवटीत निर्माण झालेली नावे आणि चिन्हे हटवून भारतीयत्व रुजवणे हे स्वदेशी सरकारचे काम आहे; जे काँग्रेसी सत्ताधाऱ्यांनी कधीच केले नाही. आता मात्र ते आवर्जून केले जात आहे. आपण त्यासाठी आपल्या सरकारचे कौतुक केले पाहिजे. विशेष म्हणजे, महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग किनारपट्टीवरील ऐतिहासिक किल्ल्यावरून हे नाव घेतले आहे, हीसुद्धा



एक महाराष्ट्रीय म्हणून आपल्यासाठी गौरवाचीच बाब आहे. विजय दुर्ग हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला एक महत्त्वाचे नौदल तळ आहे; ज्याने मराठा साम्राज्याची सागरी शक्ती प्रबळ केली होती. खरे तर, विजय दुर्ग हे भारताच्या लष्करी आत्मनिर्भरता आणि विजयाचेच प्रतीक म्हणून ओळखले जाते. ते भारतीय लष्कराची गौरवशाली परंपराही दर्शवते.

आता केवळ या किल्ल्याचेच नाव बदलण्यात आले नाही, तर किल्ल्यातील इतरही काही इमारती आणि ठिकाणांची नावे बदलली गेली आहेत. 'किचनर हाऊस'चे नाव बदलून 'मानेक्शा हाऊस' करण्यात आले आहे. 'सेंट जॉर्ज गेट'ला आता 'शिवाजी महाराज द्वार' म्हटले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होण्याच्या दिशेने पडलेले हे एक मोठे पाऊल आहे, असे म्हटले आहे. सप्टेंबर २०२२ मध्ये नौदलाने नवीन ध्वज स्वीकारला तोही छत्रपती शिवाजी महाराजांच्या मानचिन्हाने अंकित आहे. 'बीटिंग रिट्रीट' समारंभात आता भारतीय सूर ऐकता येते. राष्ट्रपती भवनातील प्रसिद्ध मुघल गार्डनचे नाव बदलून 'अमृत उद्यान' करण्यात आले, हाही याच मांदियाळीतील बदल आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून केलेले हे नामकरण स्वधर्म आणि स्वराज्याचेच प्रतीक आहे. खरे तर ही एक सुरुवात मानू या. कारण असे अनेक बदल देशात घडणे आवश्यक आहे आणि ते मोदी सरकारच घडवून आणू शकते, यात तीळमात्र शंका नाही. भारतीयांनी या अपेक्षित बदलांचे स्वागत केले पाहिजे.

स्वातंत्र्यानंतर प्रदीर्घ सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसी सरकारला ही नावं बदलता आली नाहीत, याचेच आश्चर्य वाटते. उलट, गेल्या दशकभरात तब्बल २५ शहरांच्या नामकरणाला विद्यमान केंद्र सरकारने मंजुरी दिली. त्यात सर्वाधिक कर्नाटकातील १७ शहरांचा समावेश आहे. त्याखालोखाल पंजाबमधील ४ आणि ओडिशा आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी दोन शहरांच्या नामकरणावर गृहमंत्रालयाने मंजुरीची मोहर उमटवली. औरंगाबादचे संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव असे नामकरण झाले. व्हिटी स्टेशनचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस झाले. तत्पूर्वी, बॉम्बेची मुंबई झाली होती. हे सारे बदल आपल्या संस्कृतीच्या जिवंतपणाचे लक्षण आणि गरज आहे. यापुढे गावागावांतील रस्ते आणि चौकांना तसेच काही वास्तूंना विदेशी संस्कृतीची नावे असतील तर ती तत्काळ स्थानिक प्रशासनाने बदलली पाहिजे. कारण आता या मातीला स्वत्वाचा रंग आला आहे. कोट्यवधी भारतीयांच्या अस्मिता जागृत झाल्या आहेत.

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

मोरेश्वर बडगे

# 'मेरे पास देवेंद्र फडणवीस है...!'

महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्येक पिढी एकेका नेत्याभोवती फिरत आली. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार यांच्याकडे राज्याचे नेते म्हणून महाराष्ट्राने पाहिले. सध्या ही जागा देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. ते मुख्यमंत्री आहेत म्हणून ते नेते आहेत अशातला भाग नाही. स्वभावात मवाळपणा, कुठेही इगो नाही, पक्षातल्या सगळ्या गटातटांनाच नव्हे, तर मित्रपक्षांनाही सोबत घेऊन काम करण्याची खुबी. या जोरावर देवेंद्र फडणवीस आज जनतेच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. मराठा आरक्षणाच्या आडून फडणवीसांवर दररोज हल्लाबोल करणारे मनोज जरांगे यांचीही थंडावलेली तोफ बरेच बोलून जाते. फडणवीस पुन्हा आल्यावर मराठ्यांचे मोर्चे वाढतील, आंदोलनं भडकतील हा विरोधकांचा अंदाज साफ चुकला; उलट आज कुठल्याही आक्रोशात फडणवीस टार्गेट नाहीत. कुठल्याही मुख्यमंत्र्याला मिळाला नसेल एवढा लोकाश्रय फडणवीस एन्जॉय करीत आहेत.

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृणपणे हत्या झाली. या घटनेला दोन महिने झाले. या हत्येतील आरोपींना फाशी द्या असा गावकऱ्यांचा आक्रोश आहे. पोलिसांनी या प्रकरणी काही आरोपींना अटक केली आहे. खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडला पोलिसांनी मकोकामध्ये अटक केली आहे. हा कराड राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्ती आहे. त्यावरून राजकारण तापले. मुंडे यांच्या विरोधकांना त्यांचा राजीनामा हवा आहे. मुंडे याला तयार नाहीत. 'माझा या हत्या प्रकरणाशी संबंधच नाही तर मी राजीनामा का देऊ?' असा मुंडे यांचा सवाल आहे. पूर्वी साधा आरोप झाला तर राजकारणी राजीनामा देऊन मोकळे व्हायचे. अंतुले, निलंगेकर, आर. आर. पाटील यांची उदाहरणे आहेत. एवढेच काय, सिंचन घोटाळ्यात आरोप झाले तेव्हा खुद्द अजितदादा यांना राजीनामा द्यावा लागला होता. आरोपातून सुटका झाली तेव्हा ते पुन्हा रुजू झाले. पण ते दिवसच वेगळे होते. आरोपींना घरी जा म्हणण्याचा अधिकार नेत्यांनी केव्हाच गमावला आहे. आता या सरपंचाच्या हत्येचा तपास पूर्ण होऊन कोर्टाचा निकाल यायला किती काळ लागेल, हे कोणीच सांगू शकत नाही. तिकडे 'दोषींना सोडले जाणार नाही' असे फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि मुंडे ज्या पक्षाचे मंत्री आहेत, त्या पक्षाचे सुप्रीमो अजित पवार वारंवार सांगताहेत. तरीही बीडची आग विझलेली नाही. भगवानगडाचे बाबा नामदेवशास्त्री यांचा पाठिंबा मिळवून मुंडे यांनी आगीचा भडका अकारण वाढवला. या मामल्याकडे आधीपासून वंजारी विरुद्ध मराठा असे पाहिले जात आहे. त्यामुळे प्रत्येकाने बोलताना काळजी घेणे अपेक्षित आहे. या बाबा लोकांचेही काही खरे नाही. अजितदादा जे बोलू शकत नाहीत ते नामदेवशास्त्री बोलले. त्यांनी मुंडेंना 'मिस्टर क्लीन' सर्टिफिकेट देण्याची घाई का केली, हे कोडे आहे.



'कराडशिवाय धनूभाऊंचं पान हालत नाही' असं पंकजा मुंडे यांनी मागे म्हटले होते. मग आता वाल्मीकिचा 'वाल्या' कोणी केला? कोण जबाबदारी घेणार? दिवंगत भाजपा नेते गोपीनाथ मुंडे यांच्याकडे घरगडी असलेला वाल्मीक कराड एवढा कसा वाढला? पण तुम्हाला एक सांगू का? 'वाल्मीक कराड' केवळ बीडमध्ये नाही. तो नवनव्या रूपात प्रत्येक जिल्ह्यात आहे, प्रत्येक तालुक्यात आहे, प्रत्येक गावात आहे. राजकारण्यांची ती गरज आहे. बीडमध्ये एका कराडला पोलिसांनी मकोका लावला; पण इतर जिल्ह्यातल्या 'कराडांचे' काय?

बीडचे राजकारण तापले असताना देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या दौऱ्यात कुठला कार्यक्रम ठेवला असेल? कल्पना करा. बीडमध्ये राष्ट्रवादी टार्गेटवर आहे. मुंडे संपले तर मराठवाड्याचे सारे राजकारण भाजपाच्या खिशात येते. मात्र फडणवीसांनी असा विचार केला नाही. त्यांनी दौऱ्याचा फोकस दुष्काळमुक्तीवर ठेवला. ८० वर्षांत अनेक मुख्यमंत्री होऊन गेले. तिघे तर चक्क मराठवाड्याचेच होते. काय केले त्यांनी मराठवाड्यासाठी? लोकांना पिण्याचे साधे पाणी आपण देऊ शकले नाही. उसाला मात्र पाणी देतात. कारण ऊसवाल्यांची लॉबी आहे. एका सरपंचाच्या हत्येनंतर तिकडचे बोगस धंदे उजेडात आले. वाळू माफिया, परळीत औष्णिक प्रकल्प आहे. तिकडची राख कुठे जाते? कोणालाही हा हिशोब विचारावासा वाटला नाही? मतदान केंद्रांवर रांगा लावून आपण ज्यांना निवडून देतो ते लोकप्रतिनिधी शेवटी करतात काय? मुंडेंचा लीड तर एक लाखावर मतांचा आहे. बीडमध्ये गुंड टोळ्यांचे राज्य होते, असा साऱ्यांचाच सूर आहे. मग इतकी वर्षे हे लपून कसे राहिले? या घोटाळ्यांचा 'आका' कोण? तिथले लोक ते बोलायला पुढे येणार नसतील तर मग परिवर्तनाची अपेक्षा का करावी आणि कशासाठी? 'दीवार' सिनेमात एक प्रसिद्ध डायलॉग आहे. चुकीच्या मार्गाने श्रीमंत झालेला अमिताभ बच्चन हा शशी कपूरला म्हणतो, 'मेरे पास कार है, बंगला है. तुम्हारे पास क्या है?' त्यावर शशी कपूर म्हणतो, 'मेरे पास माँ है.' हा सिनेमा येऊन कित्येक वर्षे लोटली. शशी कपूर आज आपल्यात नाहीत, पण त्यांचा तो डायलॉग 'मेरे पास माँ है?' आजही आठवला जातो. सारं जाऊ द्या. पण किती मुलं हे म्हणतात, 'मेरे पास माँ है!' आजची आई अडगळीतल्या खोलीत गेली आहे. पण त्या लायनीवर आमदार सुरेश धस यांनी जाहीर सभेत फेकलेला डायलॉग 'दिवार'मधल्या शशीलाही मारणारा आहे. बीडच्या सभेत भाजपा आमदार सुरेश धस म्हणाले, 'मेरे पास देवेंद्र फडणवीस का आशीर्वाद है...!' हे साधे वाक्य नाही. फडणवीस आपल्यासोबत आहेत हा विश्वास आज कोट्यवधी मराठी माणसाचा प्राणवायू बनला आहे. जिल्ह्यातल्या गुंडांच्या टोळ्यांचा बंदोबस्त करा, अशी मागणी या आमदाराने मुख्यमंत्र्यांकडे केली. हे काम पोलिसांचे आहे. पोलिस ते करीत नाहीत. त्यामुळे सरकार टार्गेट बनते. पोलिस गंभीर झाले तर गुन्हा घडूच शकत नाही. पाणी तिथेच मुरते. हा केवळ बीडचाच नव्हे, तर संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. सरपंचाच्या हत्येनंतर दोन महिन्यांनी फडणवीस बीडला आले, तो कार्यक्रमही जलवाहिनी पूजनाचा होता. मराठवाडा दुष्काळमुक्त करू, असे आश्वासन त्यांनी इथल्या जाहीर सभेत दिले. मात्र, त्यांना सर्वाधिक टाळ्या मिळाल्या त्या गुंडामुक्तीवर. लोकांना नेमके काय पाहिजे ते यावरून लक्षात येते. 'गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. कोणी कितीही मोठा असो, कारवाई करू' असे सांगून फडणवीसांनी जनतेला आश्वासित केले. दावोस दौऱ्यानंतर काही लाख कोटी रुपयांचे उद्योग राज्यात येऊ घातले आहेत. खंडणीखोरांना मोकळे रान मिळाले तर कोण इथे पैसे लावेल? कायदा आणि सुव्यवस्था हा आजचा मोठा प्रश्न आहे. 'हा नाराज-तो नाराज' हे राज्याचे प्रश्न होऊ शकत नाहीत. लोकांनी सहकार्य केले तरच शांत आणि प्रगत महाराष्ट्राच्या वाटेवर जाणे शक्य आहे. फडणवीसांनी नेमके दुखणे हेरले. त्यानुसार कामालाही भिडले आहेत. जगन्नाथाचा हा रथ फडणवीस ओढू शकतात. फडणवीस जे करू शकले ते महाविकास आघाडीमधला कुणी नेता करू शकला नाही. फडणवीस काही वेगळे करतात किंवा त्यांच्याकडे अल्लाउद्दीनचा दिवा आहे अशातला भाग नाही. २४ तास राजकारण करणाऱ्या नेत्याने जे करायला हवे तेच फडणवीस करीत आहेत. राजकारण आता 'पार्टटाईम' राहिलेले नाही. तुमचा नेता २४ तास उपलब्ध पाहिजे. नरेंद्र मोदींचे 'वर्क कल्चर' फडणवीस पुढे नेत आहेत. त्यामुळेच त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. फडणवीस 'वर्षा' बंगल्यावर राहायला का जात नाहीत, याची चिंता संजय राऊतांनी करू नये. मुंबई महापालिकेतले उद्धव सेनेचे 'शिल्लक दुकान' गुंडाळल्यानंतर 'वर्षा'चा मुहूर्त फडणवीस काढतील.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### महिलांना दिलासा देणारा अर्थसंकल्प

निर्मला सीतारमण यांचा अर्थसंकल्प महिलांना दिलासा देणारा व आधार देणारा आहे. कुटुंब अर्थव्यवस्था बहुतेक गृहिणीकडेच असते. मर्यादित पैशात महिना काढावा लागतो. त्यात कर भरणे म्हणजे दुष्काळात तेरावा महिना. खूपदा पगार वाढू नये व करही वाढू नये असे वाटते. केजरीवाल यांनी १० लाखापर्यंत कर मुक्ती मागितली, पण ती १२ लाख झाली आहे. त्याचा खरा फायदा निवृत्त लोकांना झाला. निवृत्तीनंतर पैसा कमी, परंतु गरजा कमी झालेल्या नसतात. टेन्शन त्यात महागाई कर वाढ. मुख्य म्हणजे खेळणी व भारतात तयार



झालेले रेडिमेड कपडे स्वस्त झाले. स्वदेशी वस्तूंची मागणी वाढेल. जीवन रक्षक औषधे स्वस्त म्हणजे दुधात साखर. मध्यमवर्गीयांसाठी आनंद देणारा अर्थसंकल्प.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### राहुल गांधींना सार्वकालिक माफी का?

'शहरी नक्षलवादी संविधान समजू शकत नाही : नरेंद्र मोदी' ही बातमी वाचली. आजवर राहुल गांधींनी देश-विदेशात अनेकदा भारताचा अपमान करणारी बेलगाम वक्तव्ये जाहीरपणे केली आहेत. भारतात तानाशाही आहे, प्रजातंत्र अस्तित्वात नाही, भारतात अल्पसंख्यक सुरक्षित नाहीत, शीख समाज सुरक्षितपणे गुरुद्वारांमध्ये जाऊ शकत नाही यासारखी अनर्गल आणि कणाहीन वक्तव्ये करून भारताची बदनामी त्यांनी अनेकदा केली आहे. २००८ मध्ये परिवाराने चीनच्या कम्युनिस्ट पक्षाबरोबर काही करार केल्याच्या बातम्याही

## वाचक पत्रे

आल्या होत्या, पण त्याची कोणतीही चौकशी झाली नाही आणि हा करार कशासाठी आणि कोणत्या मुद्यांवर झाला, हे जनतेसमोर कधीच आले नाही. २०१७ मध्ये तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष असलेल्या राहुल गांधींनी दिल्लीमध्ये रात्रीच्या अंधारात कोणालाही न सांगता दिल्लीमधील चिनी राजदूताची त्याच्या घरी जाऊन गुप्त भेट घेतली होती. कोणतीही कारवाई, चौकशी झाली नाही आणि ते प्रकरणही गुलदस्त्यात राहिले. चीनने आपल्या सीमेच्या आत अतिक्रमण केले, आपल्या सैनिकांना मारहाण केली असे आरोप तर ते सातत्याने करीत असतात. राष्ट्रपतींवर त्यांनी आणि सोनिया गांधी यांनी नुकतीच हीन टीका केली. आता तर लोकसभेतील विरोधी पक्षनेता असलेल्या राहुल गांधींनी थेट लोकसभेमध्येच भारताची बदनामी धाडस दाखवले आहे. यावर पंतप्रधान मोदींनी प्रत्युत्तर दिले असले, तरी ते पुरेसे नाही. खरा सवाल आहे, राहुल गांधी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना मोदी सरकारने सार्वकालिक माफी दिली आहे का? की, शिशुपालाप्रमाणेच राहुल गांधींचे शंभर अपराध होण्याची सरकार वाट बघत आहे? सरकारच्या नाकर्तेपणामुळे राहुल गांधींची हिंमत दिवसेंदिवस वाढत आहे. भले त्यांनी केलेले आरोप खोटे असले, तरीही भारताची होणारी बदनामी त्यामुळे थांबत नाही. की, भाजपालाच राहुल गांधी विरोधी पक्षाचा चेहरा म्हणून हवा आहे; जेणेकरून भाजपाला सत्ता मिळविणे सोपे जावे?

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### राजकारणामध्ये युवकांची भूमिका

राजकारणामध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. युवा वर्गाचे विचार, ऊर्जा आणि उद्यमशीलता समाजात मोठे बदल घडवू शकतात. युवक नवे विचार, दृष्टिकोन आणि सृजनशीलतेने भरलेले असतात. त्यामुळे ते पारंपरिक राजकारणात नवीन विचार आणून बदल करू शकतात. युवकांचा समावेश राजकारणात झाल्यास सामाजिक न्याय, पर्यावरण, शिक्षण आणि रोजगार यासारख्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता वाढते. युवा वर्ग मोठ्या संख्येने मतदार असतो. त्यामुळे त्यांच्या मतदानाचा प्रभाव राजकारणी व्यक्तींवर आणि पक्षांवर असतो. युवक अनेक सामाजिक चळवळींमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन विविध समस्यांवर आवाज उठवू शकतात. जसे की, भ्रष्टाचार विरोधी, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संरक्षण, बेरोजगारी यासंबंधी चळवळींमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. युवकांनी तंत्रज्ञान सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर करून आवश्यक माहितीचा प्रसार करणारे काम केले आहे; ज्यामुळे अधिक लोकांपर्यंत पोहोचता येते. युवकांना राजकारणात सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध झाल्यास ते स्वतःला नवा नेता म्हणून सिद्ध करू शकतात. अनेक युवक आता विविध राजकीय पक्षात उमेदवार म्हणून उभे राहत आहेत. त्यामुळे त्यांना अन्य युवकांमध्ये जागरूकता वाढवण्यास मदत होते. युवकांनी त्यांच्या हक्कांचा वापर करणे आणि समाजातील चांगले बदल घडवण्यासाठी सक्रिय राहणे आवश्यक आहे. संपूर्ण समाजाचे भवितव्य त्यांच्या हातात आहे, म्हणून युवा वर्गाला राजकारणात सक्रियपणे सहभागी होणे आवश्यक आहे.

**श्रीकांत मगर**/९६८९११७१६९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अवैध रेती उपसा विरूध्द पोलीसांची कारवाई सुरूच

## विष्णुपूरी, कल्हाळ नदीघाट परिसरातून ५७ लाखांचे साहित्य जप्त





**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ फेब्रुवारी**

अवैध वाळू उपसा करणाऱ्या रेती माफीयांवर कारवाई करुन नांदेड पोलिसांनी ५७ लाख २० हजार रुपयांची किंमतीचे रेती उपसा करण्याचे साहित्य व रेती जप्त करण्यात आली आहे.

गुरूवारी सायंकाळी नांदेड स्थानिक गुन्हा शाखा व ग्रामीण पोलीस ठाणे यांच्या संयुक्त पथकाने विष्णूपुरी शिवारात नदीच्या काठावर व कल्हाळ गावाच्या शेती शिवारात गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी वाळू उपसा करणाऱ्या या दोन्ही ठिकाणावर छापा टाकून कारवाई केली. त्यात दोन लोखंडी बोटी, रेती उपसा करणारे इंजिन, १०५ ब्रास रेती, एक जेसीबी मशिन, तीन लोखंडी क्रेन, पाच लोखंडी पाईप व पंधरा तराफे असा ५७ लाख २० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. यात आरोपी चंद्रा गोविंद क्षीरसागर, भानुदास यशवंत क्षीरसागर, मॉंटेसिंग, शेख मेहराजोद्दीन शेख निजामोद्दीन यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उप विभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक, पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने केली.

# संत दासगणू महाराज संस्थानच्या सेवेकरी गार्गीताई देशपांडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०७ फेब्रुवारी**

संतकवी श्री सद्गुरू दासगणू महाराज संस्थान येथील प.पु.स्वामी वरदानंदजी भारती यांच्या मानस कन्या कु.गार्गीताई उर्फ वसूमती दिनकरराव देशपांडे (७५) यांचे दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी उत्तरकाशी येथे निधन झाले.



गोरठे येथे प.पू.स्वामी वरदानंदजी भारती यांच्या सहवासात प्रदीर्घ काळ राहिलेल्या अभ्यासू, कडक शिस्तीच्या पण प्रेमळ स्वभावाच्या वसूताईचे आज दुःखद निधन झाले. गोरठे येथे प्रदीर्घ काळ संतश्री दासगणू महाराज संस्थान येथे त्यांनी प्रदीर्घ काळ सेवा दिली. त्यांच्या किर्तन प्रवचनाच्या माध्यमातून अनेक जण मंत्रमुग्ध होत. लहान बालकावर तसेच युवा पिढीवर संस्कार करण्यासाठी त्यांनी वेगवेगळे उपक्रम राबवले. दोन वर्षापूर्वी त्या गोरठे सोडून उत्तरकाशी येथे वास्तव्यास गेल्या होत्या. त्यावेळी हजारो भाविकांनी व भक्तांनी त्यांना साश्रूनयनांनी निरोप दिला होता. मध्यंतरीच्या काळात एक दोनवेळेस त्या गोरठे येथे आल्या होत्या. शिस्त- सेवा- नित्यनेम याचे अचरण करत त्यांनी नावलौकीक मिळविला. देशभरातून विविध भक्तगण त्यांचे चाहते होते. त्यामुळे त्यांच्या या देशभरातील परिवारातील आधाराचे मोठे छत्र हरवल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचे संपूर्ण जीवन परमार्थासाठी आदर्श होते. मुला-मुलींवर उत्तम संस्कार करुन त्यांनी मार्गदर्शन केले. प.पू.वरदानंद भारती यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण आयुष्य वाहून दासगणू परिवाराचे गोरठे येथील व्यवस्थापन समर्थपणे त्यांनी सांभाळले. कडक शिस्त त्यांनी आपल्या आयुष्यात बाळगली होती.

दि. ७ फेब्रुवारी पहाटे कैलास आश्रम, उत्तरकाशी येथे त्यांचे दुःखद निधन झाले. उद्या सकाळी दहा वाजता उत्तरकाशी येथे भागिरथी नदीच्याकाठी श्री गंगाकिनारी केदारघाट येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सबंध महाराष्ट्रातून अनेक भक्तगण उत्तरकाशीकडे रवाना झाले आहेत. नांदेड जिल्ह्यातून श्री दासगणू प्रतिष्ठाणचे अध्यक्ष महेशअण्णा आठवले, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, गोविंद नलबलवार, जालिंदर देशपांडे, नरसिंग मुक्कावार, मनोज कोडगिरे, अशोक मामीडवार, शिवा गोडगे, सुभाषराव देशमुख, शिरीषराव देशमुख, बालाजी सावंत, विमलताई सावंत, बालाजी येरावार आदी आज उत्तरकाशीकडे रवाना झाले आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### सिडकोत माता रमाई जयंती उत्साहात साजरी

**नवीन नांदेड**-त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर जयंती सिडको येथील अनेक बुद्ध विहारात माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर परिसरातील अनेक जयंती मंडळाने सिडकोतील मुख्य रस्त्याने माता रमाई आंबेडकर यांच्या तैल चित्राचे मिरवणूक काढून उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षात माता रमाई यांचा मोठा हातभार होता. क्रांतीला त्यागाची गरज असते डॉ .बाबासाहेबांच्या क्रांतीला साथ देण्याचा मोठा लढा माता रमाई ने दिला. यावरून माता रमाईने बाबासाहेबांना दिलेली साथ ही कोणत्याच उपकरणात मोजता येण्याजोगी नाही अशी आमची माता रमाई त्यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी सिडको येथील माता रमाई जयंती मंडळाने आपापल्या नगरातून माता रमाईच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक मोठ्या थाटामाटाने वाजत गाजत काढण्यात आली यावेळी महिलांची मोठ्या प्रमाणात मिरवणुकीत सहभाग होता तसेच सकाळच्या सत्रात सिडको परिसरातील पंचशील बुद्ध विहार हाडको नागलोक बुद्ध विहार संभाजी चौक रमाई चौक उस्मान नगर रोड त्रिरत्न बुद्ध विहार जय भवानी नगर उशिरा बुद्ध विहार राहुल नगर माता रमाई बुद्ध विहार शाहूनगर रामजी सुभेदार चारिटेबल ट्रस्ट रामजी नगर वाघाळा या ठिकाणी माता रमाई यांच्या प्रतिनिधी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर दुपारच्या सत्रात माता रमाई यांच्यातील चित्राची भव्य मिरवणूक सिडकोतील मुख्य रस्त्याने काढण्यात आली यावेळी सिडको परिसरातील समाज बांधवांनी विशेष म्हणजे महिला मंडळांनी जास्तीत जास्त मिरवणुकीत सहभाग नोंदवून माता रमाई अभिवादन करण्यात आले.

### स्टुडंट असोसिएशनच्या प्रदेश अध्यक्षपदी संदीप कांबळे

**मुखेड**-महाराष्ट्रतील बेरोजगारीचे जीवन जगणाऱ्या डि.टि.एड, बि.एड पास विद्यार्थ्यांच्या रखडलेल्या शिक्षक भरतीसाठी मंत्रालयात स्तरावरून आक्रमक पवित्रा घेऊन सरकारला पारदर्शकपणे शिक्षक भरती घेणं भाग



पाडणारे विद्यार्थी नेते संदिप कांबळे बिल्लाळीकर यांची डिटिएड बिएड स्टुडंट असोसिएशनच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मागील अनेक वर्षापासून विद्यार्थी, शिक्षक व बेरोजगार भावी शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी करित असलेल्या संघर्षाची दखल घेऊन डिटिएड, बिएड स्टुडंट असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष मगरे यांनी संदिप कांबळे बिल्लाळीकर यांची महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी निवड केली आहे. संदिप कांबळे यांच्या निवडीबद्दल मुखेडचे आ. डॉ तुषार राठोड, शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी,आप चे नेते धनंजय शिंदे, राष्ट्रवादीचे नेते रामदास पा. सुमठाणकर, आंबेडकरी चळवळीचे नेते राहुलदादा प्रधान , पँथर दिपकभाई केदार, सरपंच मंगेश साबळे, आप प्रवक्ते मुकुंद किर्दत, शेतकरी नेते नारायण लोखंडे, संविधान संवादक अध्यक्ष सुभाष वारे, शिवसेनेचे नेते दशरथरावजी लोहबंदे,रिपाईचे जिल्हाध्यक्ष गौतमजी काळे, माजी नगरसेवक राहुल लोहबंदे ,बिडचे युवा नेतृत्व शिवराज बांगर,प.स.मा.सदस्य जे. बी.कांबळे, सरपंच संदिप काळे, उपसरपंच अनिल हसनाळकर, सिध्दार्थ कांबळे,ड.रणजित जामखेडकर, यांच्या सह राज्यभरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### डॉ. कैलास कानिंदे यांना डी.लीट.पदवी

**भोकर**-सामाजिक,राजकीय शैक्षणिक,पत्रकारिता,आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन करणारे डॉ. कैलास गणपतराव कानिंदे रेणापूरकर यांना



त्यांच्या आंतरराष्ट्रीय संशोधन कार्याचा आढावा घेऊन युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल अमेरिका ने डी. लीट.पदवी प्रदान करून सन्मानित केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर वंचित,शोषित पिडीत घटकावर संशोधन करणारे संशोधन मार्गदर्शक गुरुवर्य प्रा.डॉ. कृष्णा शेंडे (पीपल्स कॉलेज नांदेड) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यामुळे डी.लीट.पदवी डॉ. कांनिदे यांना मिळाली आहे. डॉ. एस. राधाकृष्णन टिचर्स वेलफेअर असोशिएशन, इंडिया यांच्या शिफारशीवरून युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल अमेरिका ने डी. लीट.पदवी प्रदान केली आहे या यशाबद्दल खा. आशोक चव्हाण खा. रविद्र चव्हाण आ.श्रीजया चव्हाण, माजी आ. अमर राजुरकर,पत्रकार संघाचे नांदेड जिल्हा अध्यक्ष संतोष पंडागळे, बळीराम पाटील मिशन मांडवी तथा किनवट शिक्षण संस्था किनवट चे संस्थापक अध्यक्ष प्रफूल राठोड संस्थेचे सचिव संध्याताई राठोड रेणूकादेवी महाविद्यालय माहूर चे प्राचार्य डॉ. टी. एम. गुरनुले पत्रकार सामाजीक कार्यकर्ते व्यापारी सह अनेकांनी अभिनंदन केले.

### नारायण साधू यांचे निधन

**नांदेड**-वृंदावन कॉलनी येथील ज्येष्ठ नागरिक व इरिगेशन



विभागातील निवृत्त कर्मचारी नारायण लक्ष्मण महाराज साधू कंधारकर (वय ७६) यांचे पुणे येथे अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (दि. ७ ) दुपारी गोवर्धनघाट शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# सगरोळीत राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. ०७ फेब्रुवारी**



येथील शारदेच्या नगरीत ९ फेब्रुवारी ला राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद साजरा करत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई , व संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी जिल्हा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ९ फेब्रुवारी २५ रोजी राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन सगरोळी या सीमावरती भागात करण्यात येत आहे .या संमेलनाचे उद्घाटन राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होत असून अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील जाणकार अच्युत गोडबोले, पुणे हे उपस्थित राहणार आहेत. या साहित्य संमेलनामध्ये मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध सत्रे आणि साहित्यविषयक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

संस्कृती संवर्धन मंडळ शारदानगर सगरोळी या संस्थेची स्थापना कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांनी ६६ वर्षापूर्वी शिक्षणाचा प्रसार आणि समाज उभारण्यासाठी केली .ग्रामीण समाजाच्या उत्थानासाठी त्यांच्या निस्वार्थ निष्क्रम सेवेचा वारसा पुढेनेतसंस्थेने शैक्षणिक, सामाजिक, कृषी आणि पर्यावरणाच्या विविध उपक्रमाद्वारे प्रगती साधली आहे. या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागत अध्यक्षपद संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळीचे चेअरमन प्रमोद देशमुख हे भूषवत असून, प्रमुख पाहुणे म्हणून आमदार जितेश अंतापुरकर हे उपस्थित राहणार आहेत सोबत डॉ. प्रमोद मुनघाटे( सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई ) डॉ.प्रो. मार्तंड कुलकर्णी ( सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई ) हे उपस्थित राहणार आहेत. सगरोळी गावातील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यापासून सकाळी नऊ वाजता ग्रंथदिंडीने या साहित्य संमेलनाची सुरुवात होणार असून सकाळी १० ते १२ या वेळात उद्घाटनाचे सत्र मान्यवरांच्या उपस्थितीत होत आहे.

पहीले सत्र दुपारी बारा ते एक होत असून देविदास फुलारी यांची डॉ. पृथ्वीराज तौर , प्रा . विद्या बयास - ठाकूर हे मुलाखत घेणार आहेत .दुसरे सत्र दुपारी २-३० ते ४-३० या वेळात होत असून या सत्रात कथाकथन होणार आहे. तर तिसरे सत्रात ४.३० ते ५.३० कवी संमेलन व समारोप होणार आहे. तरी या साहीत्य संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

# सार्थक आकमार यांचा एमसीएकडून सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ फेब्रुवारी**



येथील गुरुगोविंदसिंघजी मैदानावर आयोजित मराठवाडा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने वनडे फिफ्टी-फिफ्टी मॅचेसमध्ये १६ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट सामन्यात नांदेडमध्ये पहिले शतक मारल्याबद्दल नांदेडचा युवा खेळाडू तथा महात्मा फुले हायस्कूल बाबानगरचा विद्यार्थी सार्थक आकमार याला मराठवाडा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मराठवाडा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. सदाशिव भुयारे, एमसीएचे सल्लागार विजय भोसले, मराठवाडा फायटर्सचा कर्णधार विश्वराज भोसले, अष्टपैलू खेळाडू रुद्रप्रताप देशमुख आदी उपस्थित होते. सार्थक आकमार याला महात्मा फुले हायस्कूलचे क्रीडाशिक्षक संतोष स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# वस्तीगृहातील विद्यार्थाचा १८ तासाच्या शोधानंतर सापडला मृतदेह

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ०७ फेब्रुवारी**

नायगांव तालुक्यातील सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहात राहणारा उमरी तालुक्यातील बळेगावचा आठवीत शिकणारा रितेश मारोती सुर्यवंशी हा दि.५ जानेवारी रोजी दुपारी१२:५ च्या सुमारास येथील वस्ती गृहा पासुन हाकेच्या अंतरावर असलेल्या बारुळ धरणा चा पाण्याचा भरुन वाहत आसलेल्या कालव्यात वाहून गेला होता.रितेश मारोती सुर्यवंशी या विद्यार्थ्यांचा मृतदेह तब्बल अठरा तासाच्या शोधानंतर घटना स्थळा पासून जवळपास दिड ते दोन किलोमीटर अंतरावरील कुंटूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडला आहे.

नायगांव तालुक्यातील सामाजिक न्याय विभागाच्या मागास वर्गीय वसतीगृहा मध्ये राहून तो शहरातील एका नामांकित आसणा-या शाळेत इयत्ता आठवीत शिकणारे विशाल गायकवाड, भारत साहेबराव वाघमारे, अदित्य कागडे, राजप्रिय कागडे, गंगाप्रसाद डोईवाड व रितेश मारोती सुर्यवंशी आदी सहा जण शाळेला जाण्यासाठी बुधवारी दुपारी १२.०५ मिनिटांची नोंद करुन बाहेर पडले. मात्र शाळेत न जाता ते बारुळ धरणाच्या मानार प्रकल्पातील मुख्य कालव्यात मध्ये पोहण्यासाठी गेले. पण सहापैकी रितेश मारोती सुर्यवंशी वय वर्ष (१३) हा कालव्याच्या पाण्यात वाहून गेला होता. या घटनेची



माहिती समजताच काही वेळेनंतर नायगांव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड, बिट जमादार साई सांगवीकर, तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड, बिलोली च्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे,सहायक समाज कल्याण आयुक्त शिवानंद मिनगिरे श्रीनिवास चव्हाण यांनी घटनास्थळी भेट दिली. रात्री उशिरापर्यंत पोलीस प्रशासनाच्या वतीने शोधकार्य सुरू होते पण यश आले नाही. अखेर घटनास्थळा पासून दिड ते दोन किलोमीटर अंतरावर गुरुवारी सकाळी दि.६ रोजी ७ वाजे दरम्यान कुंटूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत

रितेश मारोती सुर्यवंशी चा अखेर मृतदेह सापडला. विशेष म्हणजे तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांनी वाहून गेलेल्या रितेश सुर्यवंशी याचा मृतदेह लवकर सापडावा यासाठी बरेच प्रयत्न केले होते. बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी यांनीही रात्री उशिरा पर्यंत तालुक्याच्या तळ ठोकून शोध मोहिमेला गती देण्याचा प्रयत्न केला होता. रितेश सुर्यवंशी याच्या पार्थिवावर उमरी तालुक्यातील बळेगांव येथे अतिशय शोकाकुल वातावरणात गुरुवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## हेमाडपंथी महादेव मंदिरात चांदीच्या मुकूटाची प्राणप्रतिष्ठा

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. ०७ फेब्रुवारी**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील हेमाडपंथी महादेव मंदिर अर्थात ग्राम दैवत श्री. नीळकंठेश्वरास आदमपूर गावातील भाविक भक्तांकडून शिरी चांदीच्या मुकूटाची प्राणप्रतिष्ठा शुक्रवार दि.०६ फेब्रुवारी रोजी भक्तिभावात करण्यात आली. येथे ४५ वा अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा सप्ताहास प्रारंभ झाले आहे. त्या अध्यात्मिक पर्वाचे औचित्य साधत गावकऱ्यांच्या सहभागातून शिवलिंगास मन्मथ महाराज मठपती व सहकारी यांच्या मंत्रघोष उच्चारात विधिवत चांदीचे मुकूट बसविण्यात आले आहे. हेमाडपंथी महादेव मंदिर अतिशय सुरेख असेच आहे. आतील सजावट नक्षीदार दगडी चिऱ्यांची असल्याने भाविकांचे दर्शनाने मन प्रसन्न होते. गतकाळच्या मंदिराचे नव्याने बांधकाम करून विकास केला गेला आहे.मुकूट प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त भक्तिमय वातावरण गाव परिसरात निर्माण झाले आहे.



**किनवट : तन्जीम रहेनूमा-ए-कारवाँ अल्पसंख्यक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, किनवटच्या वतीने दि.०७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता एन. के. गार्डन येथे १३ वा मुस्लिम समाज विवाह मेळावा संपन्न झाला. या विवाह मेळाव्यात एकूण २३ मुस्लिम जोडपी विवाहबध्द झालीत या मेळाव्याप्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी, मौलाना, धर्म गुरू यांचेसह लोकप्रतिनिधी विविध पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकत्यांनी उपस्थित राहून जोडप्यांना व मेळाव्याला शुभेच्छा दिल्या.**

## परदेशी कुंभार समाज वधु वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०७ फेब्रुवारी**

परदेशी कुंभार समाज महाराष्ट्र व कुंभदीप स्तंभ समाजोन्नती बहुद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ रोजी रविवारी परदेशी कुंभार समाजातील वधू-वर परिचय मेळावा व समाजातील गुणवंतांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सदरील सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले आहे.

परदेशी कुंभार समाजातील बांधवांनी एकत्र यावे, विचारांची आदान प्रदान व्हावी, समाजातील विवाह योग्य तरुणांची लग्न जुळवेत तसेच समाजातील गुणवंतांचा गौरव व्हावा या उद्देशाने हिंगोली गेट नांदेड येथील श्री लोकमान्य मंगल कार्यालयात दि. ९ फेब्रुवारी रोजी रविवारी सकाळी साडेनऊ ते दुपारी तीन वाजताच्या कालावधीत वधु वर परिचय मेळावा व गुणवंतांचा गौरव आयोजित करण्यात आला आहे. सदरील सोहळ्यास न्यायाधीश मनोज बनचरे (यवतमाळ), उपजिल्हाधिकारी सूरेश बगळे (नागपूर), उपजिल्हाधिकारी मनोज (बंबरुळे) लोणारकर (अकोट) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सदर सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्ताधारक तसेच विविध क्षेत्रात उच्च पदस्थ अधिकारी, कर्मचारी व इतरांचा गौरव सन्मान करण्यात येणार आहे. सदरील सोहळ्यास समाजातील बहुसंख्य समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन विष्णुपंत परडे, मधुकर जोरुळे, बालाजी बंबरुळे, कैलास बंबरुळे, आनंदा पलये (युवा उद्योजक)लोहा आदींनी केले आहे.

# आमदार केराम यांनी दिली पाटोदा आश्रमशाळेला मुक्कामी भेट

## विध्यार्थी, शिक्षक कर्मचाऱ्यांशी संवाद, भोजनाचाही घेतला आस्वाद

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०७ फेब्रुवारी**

आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा जाणून घेण्यासाठी आमदार भीमराव केराम यांनी ७ फेब्रुवारी रोजी किनवट तालुक्यातील पाटोदा आश्रम शाळेला मुक्कामी भेट दिली असून यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच भोजनकक्षात जाऊन स्वतः भोजनाचा आस्वाद घेतला पाटोदा आश्रम शाळेतील एकंदर सोई सुविधाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.





किनवट तालुक्यातील शासकीय आदिवासी आश्रम शाळांना अधिकाऱ्यांनी निवासी मुक्कामी भेटी देऊन तेथील सोयीसुविधांचा आढावा घेऊन सादर करावा असे आदिवासी विभागाचे निर्देश असून त्या दृष्टीने सहा.जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी मेघना कावली यांनी किनवट तालुक्यातील एकूण १५ आश्रम शाळेसाठी भेटी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या आहेत. हे अधिकारी ७ फेब्रुवारी रोजी नेमून दिलेल्या आश्रमशाळेत जातील आणि तेथे मुक्काम थांबून सर्व प्रकारच्या सोयी सुविधाचा आढावा घेऊन तसा अहवाल आदिवासी विभागाला सादर करतील. या पार्श्वभूमीवर आमदार भीमराव केराम यांनीही ७ फेब्रुवारी रोजी किनवट तालुक्यातील पाटोदा येथील आश्रमशाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांसी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या आश्रम शाळेतील भोजन कक्षाची पाहणी करून स्वतः भोजनाचा आस्वाद घेतला. कर्मचाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानाची समस्या आमदार भीमराव केराम यांच्या निदर्शनास आणून दिली. याप्रसंगी आमदार भीमराव केराम यांच्या समवेत माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, दत्ता आडे,स्वीय सहायक निळकंठ् कातले,संतोष मरसकोल्हे हे उपस्थित होते.

### टी. सी. हरवली आहे

माझी अंजली शशिकांत भरणे या नावाची इयत्ता १२ वी पासची टी. सी. किनवट ते नांदेड प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**
**शशिकांत भरणे**
**सिर्ध्दाथनगर, ता. किनवट, जि. नांदेड.**
**९६७३५८८८१८**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त

### डोक्यात लाकडाने मारहाण करून दुखापत केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**आरोपीतर्फे अ‍ॅड.अविनाश धायगुडे यांनी बाजू मांडली**

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ फेब्रुवारी**

केज येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मा.श्री .एन.डी .गोळे यांच्या न्यायालयाने आरोपी अंकुश धर्मराज गायकवाड याची डोक्यात लाकडाने मारहाण करून दुखापत केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीनेड.आर.एम.धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ‍ॅड.अविनाश धायगुडे यांनी काम पाहिले.

शिवीगाळ करून लाथा,बुक्क्याने, चापटाने मारहाण करू आशयाची फिर्याद दिल्यावरून आरोपी विरुद्ध गु.र.क्र.१४०/२०२३ कलम ३२४,३२३,५०४,५०६ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद झाला. तपासाअंती पोलिसांनी आरोपी विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले पक्षातर्फे मा.न्यायालयासमोर साक्षपुरावा झाला. प्रकरणात आलेल्या पुराव्यावरून व सरकार पक्षाचे म्हणणे व ऍड अविनाश धायगुडे यांचा युक्तिवाद ऐकूण मा.न्यायलयांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.आरोपींच्या वतीने ड.अविनाश धायगुडे यांनी काम पाहिले तर त्यांना. ड.डी.ए. लोंढाळ,ड.ओ.ए.लोंढाळ ड.डी.डी. गडदे ,ड. पी.पी. धायगुडे यांनी सहकार्य केले.



### अखिल भारतीय ब्राह्मण कर्मचारी महासंघ अंबाजोगाई च्या वतीने श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड यांना निधी प्रदान

अखिल भारतीय ब्राह्मण कर्मचारी संघटना तालुका अंबाजोगाई यांच्या वतीने सज्जनगड येथील श्री रामदास स्वामी संस्थानला ७५१५ रुपये निधी अन्नदानासाठी प्रदान करण्यात आला. याप्रसंगी पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी राजेन बुडुक,गदाधरबुवा रामदासी,सज्जनगड येथील स्वामी, ज्येष्ठ पत्रकार अविनाशजी मुडेगावकर,ज्ञानेश मातेकर,शैलेंद्र सेलूकर व श्रीमती अंजली रामकृष्णाचार्य जोशी हे पदाधिकारी उपस्थित होते.

### रथ सप्तमी निमित्त एका कुटुंबाला किराणा साहित्याचे वाटप, तसेच एका गरजू कॅन्सर ग्रस्त रुग्णांस आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ फेब्रुवारी**

अंबाजोगाई येथील पेशवा प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रथसप्तमी निमित्त ब्राह्मण कुटुंबास दोन महिना पुरेल इतका किराणा साहित्य वाटप करण्यात आला. रथसप्तमी ला प्रथेनुसार महिला धान्याच्या राशी घालतात व त्याची पूजा करून ब्राह्मणास देतात. त्यामुळे मागील पाच वर्षापासून पेशवा प्रतिष्ठान तर्फे रथसप्तमी निमित्त एका गरजू ब्राह्मण कुटुंबास किराणा साहित्य देण्यात येते. या वर्षी औसेकर कुटुंबास रविवार पेठेतील चांगदेव महाराज मंदिरात सदरील किराणा साहित्य , साडी चोळी देण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक प्रभाकर सेलमुकर, श्री शेषेराव पांडव, राहुल कुलकर्णी , डॉ महेश अकोलकर, गोविंद जोशी, प्रतीक्षा जोशी, अनिता औटी, प्रणिता पोखरीकर,स्मिता भातलवंडे, साधना विर्धे ,ममता दीक्षित, मनीषा उपळाईकर, रोहिणी जड, प्रतीक्षा वांजरखेडकर, प्रेमा पांडव यांची उपस्थिती होती.

कॅन्सग्रस्त सीमा जोशी यांना कॅन्सर दिनानिमित्त तसेच रथ सप्तमी निमित्त पेशवा प्रतिष्ठान तर्फे ७००० रू ची आर्थिक मदत करण्यात आली




भारतीय जनता पार्टी संघटन पर्व सदस्यता नोंदणी अभियानांतर्गत सक्रिय सभासद नोंदणी शुभारंभ प्रसंगी लोकप्रिय मा.खा.प्रितमताई मुंडे यांचा सक्रिय सभासद अर्ज जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी भरुन घेतला मा.खा.मुंडे यांनी सक्रिय सभासद फी १०० रु.रोख दिले यावेळी प्रदेश ,जिल्हा,तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# केज-बीड रोडवर केज जवळ टेम्पो आणि जीपचा भीषण अपघात; अपघातात दोघे ठार









**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ फेब्रुवारी**

फेब्रुवारी रोजी सकाळी केज-बीड रोडवर केज तालुक्यातील सांगवी (सारणी) पुला जवळ कॅन्टर टेम्पो क्र. (टी एस-०१/यु सी-५५०२) आणि बोलेरो क्र (एम एच-१६/ए टी-००६२) गाडीचा अपघात झाला. यात नातेवाईकांच्या लग्नाचा बस्ता खरेदी करण्यासाठी जात असलेल्या उर्मिला उर्फ उमा श्रीराम घुले वय (४५ वर्ष) (रा. कोरेगाव ह. मु. शिक्षक कॉलनी केज) या महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर या अपघातातील जखमी असलेले लक्ष्मण डोईफोडे, राम डोईफोडे आणि इतर दोघे यांना अंबाजोगाई येथील सरकारी दवाखान्यात हलविले होते. त्यातील एकाचा देखील मृत्यू झाला आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू झालेला असून तिघे जखमी आहेत.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसाच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी बीडमध्ये सुरू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ फेब्रुवारी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व सरकारी कार्यालये व विभागांसाठी शंभर दिवसाचा कृती आराखडा आखून दिलेला आहे . या कालावधीत सर्व कार्यालय प्रमुखांनी नेमके काय करावे , या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव श्री राजेश कुमार यांनी दिनांक १५ जानेवारी रोजी व्हीसीद्वारे सर्व विभागीय आयुक्त यांची आढावा बैठक घेतली होती . या बैठकीस नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख , पुणे हेदेखील उपस्थित होते .



महसूल विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांनी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी , तहसीलदार , उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या नावे २१ जानेवारी रोजी परीपत्रक काढून शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम कशाप्रकारे राबवावा याबाबतच्या सविस्तर सूचना दिलेल्या आहेत . भूमि अभिलेख विभाग , महसूल विभाग , मुद्रांक शुल्क विभाग यांनी सध्या व भविष्यात कोणकोणत्या सुधारणा राबवायच्या आहेत याबाबत सविस्तर सूचना या पत्रात देण्यात आल्या आहेत. यात मुख्यत्वे महसूल विभाग , भूमी अभिलेख विभागाने सेवांसाठी पोर्टल तयार करून त्याची सुलभपणे अंमलबजावणी करण्यात यावी , स्वच्छता व वेगवान संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्यावर भर दिसतो .

## खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका इंगळेचा जनविकास महाविद्यालयात भव्य सहकुटुंब सत्कार

### प्रियंकाने भारताचे नाव जगात गाजवले-डॉ बाबासाहेब गोरे

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ फेब्रुवारी**

तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात भारताची पहिली महिला खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका हनुमंत इंगळे हिच्या दैदीप्यमान यशाबद्दल जनविकास महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, सत्कारमूर्ती प्रियंका इंगळे तसेच प्रियंकाच्या मातोश्री सौ. सविता इंगळे, वडील श्री. हनुमंत इंगळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रियंका इंगळे हिचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे यांच्या हस्ते बुके, शॉल,स्मृतीचिन्ह व रोख ११०००/- रुपये देऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देत असताना प्रियंका इंगळे हिने खो-खो खेळाविषयीचे स्वअनुभव सांगून विद्यार्थ्यांनी जे कोणते क्षेत्र निवडले आहे त्या क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन परिश्रम केले पाहिजेत असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे यांनी प्रियंकाची कौटुंबिक पार्श्वभूमी सामान्य असतानाही तिने स्वकर्तत्वाने खो-खो सारख्या खेळात सातत्य ठेवून देशातील विश्वचषक खो-खो टीमचे नेतृत्व करून देशाला पहिला विश्वचषक मिळवून देण्याचे काम केले, हे अतिशय महत्त्वाचे असून आमच्या परिसरातील व आमच्या आप्तस्वकीयातील प्रियंकाचा व तीने केलेल्या कामगिरीचाआम्हाला अभिमान असल्याचे मत त्यांनी व्यक्त व्यक्त करून तिच्या पुढील वाटचालीस त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. डॉ. गोपाळ भोसले यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्राध्यापक डॉ.सतीश कदम यांनी मानले. या कार्यक्रमास प्रियंका इंगळे यांचे नातेवाईक गावातील ग्रामस्थ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा




**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ फेब्रुवारी**

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहवर्धक व आनंदमयी वातावरणात साजरे करण्यात आले.

स्नेहसंमेलन संमेलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज,राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करून करण्यात आली.यावेळी शाळेतील लहान मुला-मुलांनी विविध हिंदी-मराठी गाण्यांवर अतिशय सुंदर असे नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकली तर ६ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी मोबाईलचे दुष्परिणाम सांगणारे जनजागृतीवर नाट्य सादर केले तर पहिलीच्या विद्यार्थ्यांनी पण प्रसंगावर गाणे सादर केले.

यावेळी कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणुन डॉ.बाळकृष्ण भवर,शिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे,सहा.पो मच्छिंद्र शेंडगे,अँड हनुमंत जाधव,केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे,पशुवैद्यकिय अधिकारी डॉ.गुंडाप्पा थळकरी,प.स.सदस्य उमाकांत भुसारी,डॉ.शिवाजी मस्के,जेष्ठ शिक्षक राजाभाऊ खरबड तर प्रमुख उपस्थितीत म्हणुन सरपंच सुरेश नांदे,सरपंच मंगेश गुजर,सरपंच अंगदराव इंगळे,सरपंच युवराज ढोबळे,सरपंच विश्वास शिनगारे,सरपंच अंकुराव करपे,उपसरपंच महेश लामतुरे,चेअरमन अरूण चोपणे,कृ.उ.संचालक अरूण राऊत,माजी उपसरपंच राजाभाऊ यादव,पिएसआय बाळासाहेब मस्के हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बापुसाहेब भुसारी सर्व शिक्षकवृंद कर्मचारी व श्री.स्वामी समर्थ प्रतिष्ठान व शिवशक्ती क्रिडा मंडळ यांनी परिश्रम घेतले.

## शिवजन्मोत्सव निमित्त आजपासून माजलगाव येथे श्रीमद् भागवत कथा

### शोभायात्रेत सहभागी होण्याचे बाळू ताकट यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ फेब्रुवारी**

माजलगावात शिवजन्मोत्सवा निमित्त आज (शनिवार) दि.८ पासून श्रीमद् भागवत कथेची सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी सकाळी १० वाजता शहरातील हनुमान चौक येथून मंगलनाथ मैदान येथील सभा मंडपापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बाळू ताकट यांनी केले.

शिवजन्मोत्सवा निमित्त यावेळी सामूहिक विवाह सोहळ्यासह यावेळी श्रीमद् भागवत कथा, तिरुपती बालाजी महोत्सव आदी कार्यक्रम पार पडणार असून सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी शिवजयंती पार पडणार आहे. त्याच अनुषंगाने आज (दि.८) शनिवार पासून श्रीमद् भागवत कथेची सुरुवात होणार आहे. कथावाचक सुश्री राधास्वरुपा अनन्यादीदी शर्मा यांच्या मधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा पार पडणार आहे.



तत्पूर्वी आज सकाळी १० वाजता हनुमान मंदिर, हनुमान चौक येथून मंगलनाथ मैदानावरील कथा स्थळापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत नागरिकांनी सहभागी होऊन श्रीमद् भागवत कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवजन्मोत्सव विवाह सोहळ्याचे आयोजक बाळू ताकट यांनी केले आहे.

## यशस्वी जीवनाचा मुलमंत्र शिक्षण हेच आहे-पो.नि.बंटेवाड

**तभा वृत्तसेवा**
**नवगण राजुरी दि.७ फेब्रुवारी**

देशाला आर्थिक महासत्ता आणि प्रभावी राष्ट्र बनवण्यात युवक महत्वपुर्ण भुमिका बजावू शकतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांना गुणवत्तानुरूप शिक्षण दिले गेलेच पाहिजे. यशस्वी जीवनाचा मुलमंत्र शिक्षण हेच आहे असे प्रतिपादन बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो.नि.शिवाजी बंटेवाड यांनी नवगण राजुरी येथील गजानन विद्यालयात इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी बोलतांना केले.

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.केशव भांगे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पो.नि.शिवाजी बंटेवाड हे होते. यावेळी पुढे बोलतांना पो.नि.बंटेवाड म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तीमत्वाचा पाया शाळेतच रचला जातो. शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कार, मुल्यांच्या आधारावरच पुढील शिक्षणातील यश अवलंबून असते. शाळेत मिळणार्या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असल्याने शालेय शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. तुमच्यातील जे काही सर्वोत्तम आहे ते प्रकट करणे म्हणजे खरे शिक्षण आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे. त्याला शाळेत पाठवणे हे पालकांचे कर्तव्य आहे, उध्दीष्ट साध्य करायचे असेल तर संयम, चिकाटी हे महत्वाचे माध्यम आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलतांना प्राचार्य केशव भांगे म्हणाले की, देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाची महत्वाची भुमिका लक्षात घेऊन शिक्षण विषयक कार्यक्रम राबविले जातात. मानवी जीवनाचा सर्वांगिण विकास हा त्याच्या शिक्षणावरच अवलंबून असतो. तो जितका शिक्षणामध्ये ज्ञान अर्जित करतो तो तितकाच यशाच्या शिखरावर जावून बसतो. शिक्षणाची दिशा ही माणसाच्या संपूर्ण विकासासाठी आणि त्याच्या मुलभूत अधिकारासाठी महत्वाची असते, आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक



विद्यार्थ्याने चांगले विचार आत्मसात करावेत. आपले उध्दीष्ट साध्य करावे असे सांगून इयत्ता १० व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. याशिवाय इयत्ता १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी, शाळेचे उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय., भोसले एस.बी. सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने झाली.

CMYK

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माता रमाई असीम त्यागाचे प्रतीक : भिक्खु पय्यानंद थेरो

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.७ फेब्रुवारी -**

माता रमाई या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुविद्य पत्नी होत्या, माता रमाईच्या त्यागामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वातील अद्वितीय व्यक्तिमत्व तथा भारतीय घटनेचे शिल्पकार होऊ शकले. त्यामुळे माता रमाई आंबेडकर या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील असीम त्यागाचे प्रतीक होत, असे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे.



माता रमाई आंबेडकर यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात बाबासाहेबांच्या कार्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक कष्ट आणि त्याग सहन केले.

गरीबी, अपार दु:खाचा सामना करत, त्यांनी बाबासाहेबांना त्यांच्या ध्येयात पूर्ण साथ दिली.

त्यांच्या या त्यागामुळेच बाबासाहेब समाजासाठी संपूर्णतः झोकून देऊ शकले, असे ही आपल्या मार्गदर्शनात सांगितले.



# शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी नवीन कनेक्शन द्यावे

**महापारेषणचे कार्यालय लातूरात सुरु करावे; आमदारांची महावितरणच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या बैठकीत मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७ फेब्रुवारी -**

कृषी पंपांसाठी नवीन कनेक्शन बंद असून सोलार पंप घेणं बंधनकारक केलं जात आहे. ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांचे बोअरवेल सातवे ते आठशे फुट खोल आहेत. अशा ठिकाणी सोलार पंप व्यवस्थित काम करत नाही. या निकषांचा विचार करुन नवीन कनेक्शन देण्याचे धोरण स्वीकारावे. तसेच महापारेषणच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयाचे विभाजन करुन लातूर, धाराशिव व इतर एक ते दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र महापारेषण कार्यालय सुरु करावे. यासह अनेक विषयांबाबत महावितरणचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्याकडे आमदार अभिमन्यू



पवार यांनी पाठपुरावा केला आहे

औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने व अखंडित विद्युत पुरवठा करण्या बरोबरच रोहित्र वेळेवर दुरुस्त करून द्यावीत, विद्युत उपकेंद्रांची क्षमता वाढ करण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, मंजूर नवीन उपकेंद्राचे काम तातडीने सुरु करुन फिडर सेपरेशनची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. यासाठी आमदार अभिमन्यू पवार सातत्याने प्रयत्न करीत आहेत. यासह इतर मागण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी मुंबई येथे महावितरणचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांची भेट घेतली. औसा मतदारसंघातील आरडीएसएस अंतर्गतची सुरु असलेली कामे वेगाने पूर्णत्वास नेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात याव्यात. आरडीएसएस -एमएचकेव्हीवाय २ अंतर्गत अनेक कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाले आहेत. पण कामे सुरू झाली नाहीत. अशा कामांचा आढावा घेऊन रखडलेली कामे तातडीने सुरू करण्यात यावीत. खरोसा, तपसे चिंचोली व औसा विद्युत उपकेंद्रांची क्षमता ५ एमव्हीएने वाढविण्यास कार्यारंभ आदेश निर्गमित झालेले आहेत. या तिन्ही विद्युत उपकेंद्रांची तातडीने क्षमता वाढ करण्यात यावी. एडीबी योजनेअंतर्गत ६३ केव्ही क्षमतेच्या रोत्रित्रांची क्षमता वाढवून १०० केव्ही करण्यात यावी.महावितरणच्या निरंतर योजनेअंतर्गत औसा मतदारसंघासाठी २०० रोहित्र उपलब्ध करून देण्यात यावेत. कृषी पंपांसाठी नवीन कनेक्शन बंद असून सोलार पंप घेणं बंधनकारक केलं जात आहे. ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील बोअरवेल सातशे ते आठशे फुट खोल आहेत. आणि अशा ठिकाणी सोलार पंप व्यवस्थित काम करत नाही. ही बाब विचारार्थ घेऊन निकषांच्या अधिन राहून नवीन कनेक्शन देण्याचे धोरण स्वीकारावे. कासार सिरसी येथे १३२ केव्हाही क्षमतेचे विद्युत केंद्र मंजूर करावे. महापारेषणचे कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आहे.

या कार्यालयाचे विभाजन करून लातूर, धाराशिव व इतर एक ते दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र महापारेषण कार्यालय लातूर येथे सुरु करावे. पॉवर ऑन व्हील (फिरता डीपी) ही संकल्पना संपूर्ण राज्यात राबविण्यात यावी, आदी विषयांसंदर्भात आ. अभिमन्यू पवार यांनी पाठपुरावा केला आहे.

## अनेक बस गाड्या बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण बंद

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.७ फेब्रुवारी-**

शिरूर अनंतपाळ तालुक्याची निर्माती होऊन २५ वर्ष उलटत आहेत पण या तालुक्यातुन केवळ दहा पाच गाड्या फेरे मारतात. एकतर रस्ते खराब शेतकरी व कष्ठकरी मजूर गोर गरीब पाल्यांचे मुले मुली उच्च शिक्षण घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी येत होते पण काही महिन्या पूर्वी सुरू केलेल्या बस गाडया अचानक बंद केल्यामुळे तालुक्यातील थेरगाव, हिप्पळगाव, येरोळ, साकोळ, दैठणा, हालकी व चाकूर तालुक्यातील सुगाव येथील शेकडो मुले मुली उच्च शिक्षण घेण्यासाठी शिरूर अनंतपाळ येथे दररोज ये-जा करतात पण उदगीर व लातूर आगाराकडून बस सोडण्याची मागणी येथील विद्यार्थी व विद्यार्थीनीने जिल्हा अधिकाऱ्याला संपर्क साधून विनंती केली आहे.

तालुक्यातील येरोळ, साकोळ, थेरगाव, हिप्पळगाव हे गावे लोक संख्येच्या दृष्टीने मोठे आहेत. पण या गावातुन शेकडो विद्यार्थी दररोज शिरूर अनंतपाळ येथे माध्यमिक, उच्च माध्यमिक, शासकीय औधोगीक प्रशिक्षण संस्थे बरोबरच बीए, बी.एस्सी, बी. कॉम सारख्या महाविद्यालयीन शिक्षणा बरोबरच फार्मसी, नर्सिंग कॉलेजला शिकण्यासाठी शेकडो विद्यार्थी दररोज बसने ये-जा करीत होते.

पण अचानक नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात उदगीर आगाराची सुरु असलेली बस गाडी अचानक बंद केल्यामुळे येरोळ, थेरगाव, हिप्पळगाव, सुगाव, साकोळ येथील विद्यार्थ्यांची हेळसांड होत आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या उच्च शिक्षणावर पाणी सोडण्याची वेळ आल्याची खंत विद्यार्थिनींने आपल्या भावना तरुण भारतच्या प्रतिनिधी जवळ व्यक्त केल्या.

आम्हाला कोणी न्याय देईल का? महाविद्यालय व शाळा वाले म्हणतात की आम्ही काय करू शकता आम्ही ही आनेक वेळा विभागीय नियंत्रक लातूर व आगार प्रमुख उदगीर यांच्याकडे बस सुरू करण्यासाठी विनंती केली पण त्यांनी आमच्या अर्जाच्या विनंतीला दाद दिली नाही. आमच्या विनंतीच्या पत्राला केराची टोपली दाखवली.

त्यामुळे आम्ही काही ही करू शकत नाही. तुम्ही तुमचे शिक्षण बंद करा असे आई-वडील म्हणतात. एकीकडे शासन मोफत शिक्षण देण्याच्या वल्गना करते. एकीकडे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सोयी आभावी शिक्षण बंद करावे लागत आहे.

## उपेक्षित तृतीयपंथीयांना समजून घेऊन जगण्याचे बळ देण्याची गरज : देवयानी देशमुख




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.७ फेब्रुवारी -**

माणूस हा समाजशील प्राणी आहे. त्याला एकटे राहणे पसंत नसते. माणसाचे पुरुष व स्त्री असे मुख्यतः दोन घटक आहेत. यामध्ये तिसरा घटक अस्तित्वात असून जन्मदात्यापासून ते इतर समाजाकडून सातत्याने उपेक्षितच आहे, तो म्हणजे तृतीयपंथी, जो जन्मापासूनच आपल्या वेगळेपणाची अनुभूती घेत असतो. वयात आल्यावर तो कुटुंबातून बाहेर फेकला जातो तर इतर समाज त्यांना स्वीकारत नाही. शिक्षणा आणि व्यवसाय या दोन्हीतूनही त्यांना दूर सारण्याचा प्रयत्न होतो. यामुळे त्यांना खूप मोठा मानसिक त्रास होतो. शेवटी नाईलाजाने ते दीक्षा मागतात. अशा उपेक्षित तृतीयपंथीयांना समजून घेऊन जगण्याचे बळ देण्याची गरज आहे असे मत प्रसिद्ध व्याख्यात्या देवयानी देशमुख ऊर्फ माई, पुणे यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात या साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळ, उदगीर अंतर्गत गेल्या चौदा वर्षापासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या सोमवारी अखंडितपणे संपन्न होत आलेल्या व आज संपन्न झालेल्या या ३३० व्या वाचक संवाद मध्ये उच्च शिक्षित तथा प्रसिद्ध व्याख्यात्या देवयानी देशमुख (माई ), पुणे यांनी बिंदूमाधव खिरे लिखित समलिंगी, उभयलिंगी, पारलिंगी, तृतीयपंथी, द्विलिंगी, ट्रान्स वुमन, ट्रान्समॅन व क्विअर समाज या साहित्यकृतीवर अत्यंत प्रभावी संवाद साधला. भरत गायकवाड यांचे अध्यक्षतेखालील पुढे बोलताना त्यांनी या सर्वांबद्दल वैद्यकीय माहिती, लिंग बदल आणि वैद्यकीय प्रक्रिया, कायदे, त्यांच्या समस्या, नावात बदल, ओळखपत्र, लिंगभाव, लैंगिक समस्या, त्यांच्या संस्था आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था लिंग बदलानंतर बालदत्तक घेण्याची प्रक्रिया या सर्वांबद्दल सविस्तर माहिती सांगितली. तेव्हा समाजाने चुकीच्या धारणा व गैरसमज दूर सारून त्यांना समजून घेत त्यांच्या भावभावनांचा आदर करत त्यांना जगण्याचे बळ देणे अत्यंत गरजेचे आहे. समाज दीक्षा देतो पण काम देत नाही. उपयोग घेतो पण त्यांच्याकडून काम करून घेत नाही.

यानंतर झालेल्या चर्चेत उपस्थित अनेक स्त्री-पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी अत्यंत मोकळेपणाने संवादक आणि वाचक श्रोते यांच्यात सखोल अशी चर्चा झाली, तृतीयपंथीयांचे जीवन, वागणे, नाईलाज, व्यवसाय या सर्वांबरोबरच समाजात असलेली त्यांच्याबद्दलची धारणा त्यांच्याबद्दलचे विचार आणि समाजाकडून त्यांना दिली जात असलेली वागणूक याबरोबरच लैंगिक आकर्षण, संभोग, संतती, संपत्ती, त्यांचे एकूण जीवन या अनुषंगाने अनेक प्रश्न विचारले गेले आणि या सर्व प्रश्नांचे सहज हसत हसत तेवढ्याच गांभीर्याने उत्तरे देऊन हा कार्यक्रम अत्यंत एका उंचीवर नेण्याचे काम संवादक देवयानी देशमुख यांनी केले. वाचक संवादाच्या इतिहासात हा पहिलाच कार्यक्रम ज्यामध्ये एका वेगळ्या विषयावर आणि अत्यंत खोलवर अशी चर्चा घडून आली. यामुळे उपेक्षित समाजाबद्दलच्या लोकांच्या चुकीच्या धारणा आज संपुष्टात आल्या.

> तृतीयपंथीयांना लहानपणा पासूनच वेगळेपणाची जाणीव होते. वयात आल्यावर त्यांना घरच्यासहित इतर समाजही स्वीकारत नाही. त्यांना त्यांचे आयुष्य एकट्यानेच काढावे लागते. त्यांना स्वत:ची कुठली संपत्ती अथवा संतती असत नाही. ते वडिलांच्या प्रॉपर्टीत कधीही हिस्सा मागत नाहीत. त्यांच्यामध्ये जातीभेद नसतो. ते प्रचंड आशावादी असतात. केवळ श्रद्धा आणि विश्वासाच्या बळावर आपले आयुष्य आत्मविश्वासाने जगतात, असे देवयानी देशमुख यांनी सांगीतले.

शासकीय दुध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्याकार्यक्रमाचे अत्यंत प्रभावी सूत्रसंचलन संयोजक अनंत कदम यांनी केले. पाहुण्यांचा परिचय हनुमंत म्हेत्रे, यांनी करून दिला तर आभार अर्जुनराव सोमवंशी यांनी मानले. या कार्यक्रमास परिसरातील अनेक डॉक्टर, वकील, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक, व्यापारी-वाचक रसिकांसह बालगोपाळ, स्त्री पुरूष मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी बँकेचे अधिकारी मुरलीधर जाधव, पोलिस अधिकारी भागवत जाधव, प्रा. राजपाल पाटील, मुख्याध्यापक मोहन निडवंचे, लेखक तुकाराम बिरादार, प्राचार्य डॉ. शिवाजी सगर, उद्योजक कचरूलाल मुंदडा, प्राचार्य डॉ. नामदेव खंडगावे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यशवंतराव बिरादार, नाटककार तुळशीदास बिरादार, सुरेश वजनम, आदिंसह अनेक मान्यवरांनी परिश्रम घेतले.

## 'केशवराज'मध्ये स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.७ फेब्रुवारी -**

येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात ५ वी ते ७ वी विभागात स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण समारंभ झाला.

याप्रसंगी मंचावर समारंभाचे अध्यक्ष सुरेंद्र आलूरकर, प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, लातूर अविनाश देवशटवार, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य राम कुलकर्णी, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, मुख्याध्यापक महेश कस्तुरे, धनंजय कुलकर्णी, जितेंद्र जोशी, सार्थक जहागीरदार, श्रावणी ईश्वरशेटे यांची मंचावर उपस्थिती होती.

## माणूसमारवाडी जि.प. शाळेची राज्यस्तरीय कॉमप्यूटर सायन्स हॅकेथॉन स्पर्धेसाठी निवड

**लातूर जिल्ह्यातून एकमेव माणूसमारवाडी शाळेची निवड... विजेत्या तीन मुलींचा केला सन्मान...**

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.७ फेब्रुवारी -**

मुलामध्ये संगणकीय विचार सहयोग, सांघिक कार्य (टीमवर्क) तार्कीक विचार आणि कोडिंग याचे ज्ञान अवगत होण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभाग लातूरच्या वतीने शैक्षणिक वर्षे २०२४-२५ पासून अमेझॉन फ्युचर इंजिनिअर प्रोग्राम राबवण्यात येत आसल्याने या स्पर्धामध्ये २५ शाळांनी व ७०७ विद्यार्थांनी सहभाग घेतला होता त्यापैकी रेणापूर तालूक्यातील माणूसमारवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील तीन मुली यशस्वी ठरल्याने त्यांची राज्यस्तरावर निवड झाल्याने त्यांचे ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करुन शुभेच्छा देण्यात आल्या.



रेणापुर तालूक्यातील एक उपक्रमशील आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा म्हणून माणूसमारवाडी येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेचा उल्लेख केला जातो. या शाळेतील ईयत्ता ८ वी वर्गात शिक्षण घेत आसलेल्या तीन मुलीच्या सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शालेय समितीचे अध्यक्ष रामेश्वर चव्हाण होते तर प्रमुख अतिथी म्हणून बाबासाहेब शिंदे, कलापंढरीचे मधुकर गालफाडे, मुख्याध्यापक गौतम टाकळीकर, एस.जी. सुरवसे, कुसूंबे, आर. के. अर्विकर, एस.व्ही. मामलिवाड, आर एच पिंडकुरवार, गणेश चव्हाण, रामदास सिरसाट आदी सह शिक्षक विद्यार्थी यांची उपस्थिती होती. नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थी २१ व्या शतकातील कौशल्य आत्मसात करावी व त्याच बरोबर मुलांमध्ये संगणकीय विचार, सहयोग, सांघिक कार्य, तार्कीक विचार, आणि कोडिंग याचे ज्ञान मिळावे म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड व जिल्हा परिषद शिक्षण विभाग लातूर अमेझॉन फ्यूचर इंजिनिअरींग लीडरशिप फार ईक्विटी आणि कोड टू ईनहान्स लर्लिंग यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक वर्षे २०२४-२५ पासून अमेझॉन फ्यूचर इंजिनिअरींग प्रोग्राम राबविण्यात येत आहे.या स्पर्धेसाठी लातूर जिल्ह्यातील २५ शाळा मधुन ७०७ विद्यार्थांनी नोंदणी करुन सहभाग घेतला होता. त्यातील ३ शाळांची आणि ९ विद्यार्थाची निवड जिल्हास्तरीय बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी करण्यात आली आसून त्यातुनही सर्व उत्कृष्ट अन प्लग चैलेंज पुर्ण करणारी लातूर जिल्हातील एकमेव शाळा म्हणजे रेणापूर तालूक्यातील माणूसमारवाडी येथील जिल्हा परीषद शाळा होय या शाळेची पुढील राज्यस्तरावर होणाऱ्या स्पर्धे साठी निवड झाली आहे.

या मध्ये घवघवीत यश संपादन करणाऱ्या ईयत्त ८ वी वर्गातील राधिका रामेश्वर चव्हाण, सिमरण शहरात शेख आणि महेक मौला शेख या तीन मुलींनी यशाच शिखर गाठल्यामुळे त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असल्यामुळे नुकताच ग्रामस्थ व शाळेच्या वतीने त्यांचा सन्मान करुन पुढील कार्यास शुभेच्या देण्यात आल्या आहेत.

# समाजातील समस्या सोडविण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करा : किरण कोरे

### राष्ट्रीय स्तरावरील विश्व व्हर्टेक्सचे उद्घाटन...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७ फेब्रुवारी -**

राष्ट्रीय स्तरावरील टेक्निकल इन्हेंटमेटचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे अवरनेस निर्माण केल्याबद्दल विश्वेश्वरय्या संस्थेचे कौतुक करुन अशा टेक्निकल इव्हेंन्टमधून मिळणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांनी समाजातील समस्या सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन व्याख्याते किरण कोरे यांनी केले.




औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील विश्व व्हर्टेक्सचे उद्घाटन सुप्रसिध्द व्याख्याते किरण कोरे, उध्दव बडगिरे, उपप्राचार्य व्हिआयटी कॉलेज, लातूर यांच्या हस्ते करण्वयात आले. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.

संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, संचालक विश्वनाथ निलंगेकर, प्रा. राठोड, डॉ.एस.एस. कानडे, विभागप्रमुख, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन लातूरचे विभाग प्रमुख सचिन राऊत, व्हिडीएफ स्कुल ऑफ पॉलिटेक्निक लातूरचे विभागप्रमुख प्रा.एस.एन. नागुरे, सहाय्यक प्राध्यापक, बिडवे, प्रा. सुरज बिराजदार, सहाय्यक अभियंता राम चिगुरे, एम.एस. बिडवे इंजिनीअरिंग कॉलेज लातूरचे प्रा.पंकज कागने, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन लातूरचे प्रा. धुलगुंडे, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, विभाग प्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. अंकुश बिडवे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश मांडे उपस्थित होते.

या टेक्निकल इव्हेंन्टमध्ये पेपर प्रेझेन्टेशन करिता १४४, प्रोजेक्ट कॉम्पिटीशन साठी ९३, क्विझ कॉम्पिटीशनसाठी ५४१, हॅक्थॉन करिता ७१ एकुण ८४९ विविध अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

यावेळी कार्यक्रमात विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील संगणक विभागप्रमुख प्रा. अब्दुल समद काझी यांनी लिहीलेल्या दोन पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या दोन पुस्तकांचे अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी उपयोगी पडणार आहेत.

या टेक्निकल इव्हेंन्टकरिता परिक्षक म्हणुन डॉ.एस.एस. कानडे, विभागप्रमुख, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर, डॉ. उध्दव बडगिरे, उपप्राचार्य व्हिआयटी इंजिनीअरिंग कॉलेज, प्रा. सचिन राऊत, विभागप्रमुख, व्हिडीएफ स्कुल ऑफ पॉलिटेक्निक, लातूर, प्रा.एस.एन. नागुरे, प्रा. पंकज कोकणे, सहाय्यक प्राध्यापक, एम. एस. बिडवे इंजिनीअरिंग कॉलेज, लातूर, प्रा. अंकित गायकवाड, मयुर शिंदे, शिल्पा वेल्लाळ, प्रा. सुरज बिराजदार, सहाय्यक अभियंता, राम चिगुरे, प्रा. पांडुरंग राठोडे, स्थापत्य विभागप्रमुख, शारदा पॉलिटेक्निक, औराद शहाजनी यांनी काम पाहिले.

या विश्व-व्हर्टेक्स टेक्निकल इव्हेन्टसाठी प्रायोजक म्हणुन टेक्नोसॉफट प्रा.लि., लातूर, स्किल्झवे, प्रा.लि. लातूर, गटागट बुक स्टोअर, लातूर, एआयआयटीएम कॅड सेंटर, लातूर, एएमबी सिडीएसपी, छ. संभाजीनगर यांचे सहकार्य लाभले.

### कलागुणांना वाव मिळण्यासाठी इव्हेंन्टचे आयोजन : प्राचार्य प्रशांत धाराशिवे

संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना एक नवा प्लटफार्म मिळावा. यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तसेच कला गुणांना वाव मिळावा. आजच्या स्पर्धेच्या युगात तंत्रज्ञानाचे कौशल्य विद्यार्थ्यांना अवगत व्हावे. या उद्देशाने विश्व व्हर्टेक्स सारख्या टेक्निकल इव्हेंन्टचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागप्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अजित लोकरे, प्रा. अब्दुल समद काझी, यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अस्मा मुलानी, नेहा थोरात यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य प्रा. गोपाळ दंडिमे यांनी केले.

यावेळी विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत १८१४ शेतकऱ्यांनी भरला बोगस पीकविमा

## कृषी विभागाचे चौकशीचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

जिल्ह्यात तब्बल ४५०० हेक्टर क्षेत्रावर १८१४ शेतकऱ्यांनी बोगस पीकविमा भरल्याचे प्राथमिक तपासणीमध्ये स्पष्ट झाले असून यामध्ये परजिल्ह्यातील शेतकऱ्यांचा समावेश असल्याचा संशय आहे. त्यानुसार आता या शेतकऱ्यांची तसेच अभिलेख्यांची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने दिले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात यावर्षी खरीप हंगामात २.५० लाख शेतकऱ्यांनी पीकविमा भरला.यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, कापूस व तूर या पिकांचा समावेश आहे. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा मिळण्याची प्रतिक्षा आहे. तर जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचा अहवाल देखील महसूल विभागाने शासनाकडे सादर केला आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा द्यावा या मागणीसाठी शेतकरी संघटनेचे नामदेव पतंगे, गजानन कावरखे, गजानन सावके यांच्यासह शेतकऱ्यांनी अनेकवेळा प्रशासनाकडे निवेदने दिली. आंदोलने केली. मात्र अद्यापही शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नाही.

दुसरीकडे, राज्यातील इतर जिल्ह्यात बोगस पीकविमा भरल्याचे प्रकार उघड झाल्यानंतर हिंगोली जिल्ह्यातही कृषी विभागाने प्राथमिक चौकशी केली आहे. या चौकशीमध्ये ७६ शेतकऱ्यांनी २०७ हेक्टर क्षेत्रावरील शासकीय जमिनीवर पीकविमा भरला असून त्यात १.१२ कोटी रूपयांची पीकविमा रक्कम संरक्षित केली आहे. यामध्ये १९ शेतकऱ्यांनी सीएससी केंद्रावरून पीकविमा भरला आहे.

याशिवाय १७३८ शेतकऱ्यांनी ४३०९ हेक्टर क्षेत्राचा पीकविमा भरला असून त्यातून २३.५२ कोटी रूपयांची रक्कम विमा संरक्षित केली आहे. यामध्ये ८६ शेतकऱ्यांनी स्वत: तर १६५२ शेतकऱ्यांनी सीएससी सेंटरवर वीमा भरला आहे. विशेष म्हणजे या विमाधारक शेतकऱ्यांच्या जमिनीची महसूल अभिलेख्याला नोंदच नसल्याचे समोर आले आहे. त्यानुसार एकूण १८१४ शेतकऱ्यांनी ४५१७ हेक्टर क्षेत्रावर बोगस पिकवीमा भरल्याचे स्पष्ट होत असून या शेतकऱ्यांनी २४.६४ कोटी रूपयांची रक्कम विमा संरक्षित केल्याचे दिसून आले आहे. या शेतकऱ्यांबाबत संशय आल्यामुळे आता या प्रकाराची चौकशी सुरू करण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्यात बोगस पीकविमा भरणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये काही बाहेर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचाही समावेश असल्याचे समजते.

या प्रकरणात जिल्हा अधीक्षक कृशी अधिकारी राजेंद्र कदम यांनी हिंगोलीसह सेनगाव, वसमत, औंढा नागनाथ, कळमनुरी तालुका कृषी अधिकारी कार्यालयांना पत्र पाठविले आहे. यामध्येया संशयीत बोगस पीकविम्याची कृषी सहाय्यकामार्फत १०० टक्के तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता या चौकशीमध्ये काय स्पष्ट होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात यावर्षी खरीप हंगामात पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना नुकसान होऊन देखील पीकविमा मिळाला नाही. तर दुसरीकडे बोगस पीकविमा भरल्या गेल्याचे उघड होत आहे. हा जिल्ह्यातीलल शेतकऱ्यांवर अन्याय आहे. कृषी खात्याने या बोगस शेतकऱ्यांवर कारवाई कावी तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा देऊन न्याय मिळवून द्यावा अशी मागणी नामदेव पतंगे व गजानन कावरखे यांनी केली आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यात बोगस पीकविमा भरल्याचा प्रकार भाजपचे आ. सुरेश धस यांनी उघडकीस आणल्यानंतर सरकार खडबडून जागे झाले असून अशा शेतकऱ्यांवर तसेच सीएससी सेंटरवर कारवाई करण्यात यावी अशी मागणीही होत आहे.

## शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची चित्ररथातून प्रसिध्दी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना सन २०२४-२०२५ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची गरजूंना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हाभरात चित्ररथ फिरत असून, नागरिकांनी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर हिरवी झेंडी दाखवून प्रचार-प्रसिद्धी मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला आहे. हे चित्ररथ जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागात जाऊन प्रचार-प्रसिध्दी करत आहेत. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा समाज कल्याण अधिकारी यादव गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी. गं. गो. चितळे यांच्या सहयोगाने हा चित्ररथ फिरत आहे.

आतापर्यंत जिल्ह्यातील औंढा नागनाथ, सेनगाव शहर आणि शिरड शहापूर, उमरा, टाकतोडा, आजेगाव, कवठा, वरुड चक्रपाणी, सापटगाव, सुळदाली (खुर्द) वाढोना, गोळेगाव, सेंदुरसना, सिराळा, रुपुर, म्हाळशी आणि वडद या गावांमध्ये विविध योजनांची जनजागृती करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना तसेच लाभार्थ्यांना या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होत आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शासकीय वसतिगृह व निवासी शाळा चालविणे, अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, रमाई आवास योजना (घरकुल), सैनिक शाळेतील अनुसूचित जाती, विजाभज, विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता यासह विविध शासनाच्या कल्याणकारी योजनाची लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित हे चित्ररथ जिल्ह्यात प्रसिद्धी करत आहेत. त्यामुळे या चित्ररथाच्या माध्यमातून पात्र व गरजू नागरिक तसेच लाभार्थ्यांना विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

चित्ररथाद्वारे जनजागृती करण्यासोबतच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजना, बालविवाह प्रतिबंधक कायदा: सन २००६, मागेल त्याला सौर कृषि पंप, आयुष्यमान भारत, महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना आणि अनुसूचित जाती उपयोजनाअंतर्गत मागासवर्गीय मुलां-मुलीसाठी शासकीय वसतिगृह, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना, रमाई आवास योजना (घरकुल) या कल्याणकारी योजनांवर आधारित भित्तीपत्रिकाही वितरीत करून त्याद्वारेही प्रसिद्धी करण्यात येत आहे.

## लाडक्या चार भावांनी उचलले लाडकी बहिण योजनेचे पैसे नाव कमी करण्याच्या पत्रानंतर झाला उलगडा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमधील कारनामे आता हळूहळू उघडकीस येऊ लागले आहेत. हिंगोली जिल्ह्यातील चार लाडक्या भावांनीच लाडकी बहिण योजनेत नावे टाकून सहा हप्ते उचलले आहेत. विशेष म्हणजे कारवाईच्या भितीने या भावांनी दिलेल्या अर्जावरून हा उलगडा झाला आहे. आता या प्रकरणात शासनाच्या निर्देशानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे महिला व बालविकास विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

राज्यात शासनाने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू केली. या योजनेत पात्र महिलांना दरमहा १५०० रूपये देण्यात येत आहेत. सदरील रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा होत आहेत. त्यासाठी महिलांनी ऑनलाईन प्रस्ताव दाखल करून त्यांचे आधारकार्ड, बँक खाते क्रमांक तसेच छायाचित्र अपलोड करण्यात आले होते. दरम्यान, हिंगोली जिल्ह्यातून ३०५० लाख महिलांनी लाडकी बहिण योजनेचे अर्ज दाखल केले होते. पंचायत समितीस्तरावरून सदर अर्ज मंजूर केल्यानंतर महिलांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आली. त्यानंतर शासनाने काही दिवसांपूर्वीच या योजनेचा लाभ बंद करण्याबाबत अर्ज देण्याचे आवाहन केले. त्यानुसार हिंगोली जिल्ह्यातून आठ जणांनी लाभ बंद करण्याचा अर्ज दिला आहे. विशेष म्हणजे यामध्ये चार पुरूषांचा समावेश आहे.

यासंदर्भात महिला व बालविकास अधिकारी राजेश मगर यांनी सांगितले की, योजनाचा लाभ बंद करण्यासंदर्भात आठ अर्ज प्राप्त झाले असून यामध्ये चार पुरूषांची नावे असल्याचे दिसून आले आहे. त्यांनी आधारकार्डवर महिलांचे छायाचित्र लावून प्रस्ताव दाखल केला असावा. या चौघांच्या बँक खात्यावर सहा हप्ते जमा झाल्याचेही त्यांनी सांगितले. सदर चारही औंढा तालुक्यातील असून महेश भांडे, रामराव काळे, गजानन काळे, शिवाजी भांडे अशी चौघांची नावे आहेत.

या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली असून नेमकी नावांत चूक झाली आहे काय याची तपासणी करून त्यामध्ये सत्यता आढळून आल्यास शासनाच्या निर्देशानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे मगर यांनी सांगितले.



**हिंगोली- शहरातील बसस्थानकात प्रवाशांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागात बसेसची कमतरता असल्यामुळे प्रवाशांना तासनतास ताटकळत उभे टाकावे लागत आहे तसेच उन्हाळ्याचे दिवस असतांना बसस्थानकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी आहे. छाया- सुनील पाठक**


## संक्षिप्त वृत्त

### रूक्मीणीमध्ये माता रमाई जयंती साजरी



हिंगोली- रुख्मिणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पळशी मध्ये शुक्रवारी माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य तावरे आणि पर्यवेक्षक मोरे यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले. शिक्षक प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. व प्राध्यापिका श्रीमती खंदारे यांनी माता रमाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. पर्यवेक्षक मोरे यांनी माता रमाई याच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ढोले यांनी तर सूत्रसंचालन गिते यांनी केले तर आभार प्रदर्शन चापके यांनी मानले.

### आर्य वैश्य महासभा जिल्हाध्यक्षपदी गिरीश गुंडेवार



हिंगोली- हिंगोली जिल्हा आर्यवैश्य महासभेची निवडणूक संदर्भात बैठक दिनांक ६ मार्च २०२५ रोज गुरुवारी आर्यवैश्य भवन येथे संपन्न झाली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रदीप कोकडवार, ज्ञानेश्वर मामडे, अनिल मुंगटकर व डॉ विजय निलावार उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्षपदी गिरीश गुंडेवार, सचिवपदी आनंद निलावार, कोषाध्यक्षपदी ॲड अशोक डूब्बेवार व जिल्हा कार्यकारी अध्यक्ष म्हणून महेश गोविंवार यांची एक मताने निवड करण्यात आली. या वेळी राजकुमार गुंडेवार, गिरीश बासटवार, प्रशांत गुंडेवार, कुणाल गुंडेवार, डॉ व्यंकटेश दमकोंडवार, विक्रम गोविंदवार, पवन गुंडेवार, अतुल निलावार, राम गुंडेवार, विक्रांत व्यवहारे,राहुल निलावार, सचिन गुंडेवार, राजकुमार निलावार,विकास कापरतवार,आनंद गुंडेवार, कृष्णा निलावार, बालाजी बासटवार, प्रणव गंधेवार, गणेश निलावार, आशिष पिंगळकर, संतोष प्रतापवार, बंटी गंधेवार, अमित गुंडेवार,पंकज गुंडेवार, पवन गुंडेवार, निलेश पिंगळकर, प्रवीण निलावार, ऋषिकेश गुंडेवार यांच्यासह आर्यवैश्य समाजातील सदस्य उपस्थित होते.

## शिवजन्मोत्सवानिमित्त महिला समितीची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती हिंगोलीच्या वतीने शिवजन्मोत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. या अनुषंगाने महिलांची बैठक घेण्यात आली. यामध्ये महिलांचा सहभाग जनजागृती, विविध आयोजन, या संदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती हिंगोलीच्या वतीने बुधवार दि.५ फब्रुवारी रोजी शासकीय विश्रामगृहात महिला समितीची बैठक समितीचे अध्यक्ष ॲड.उल्हास पाटील, सचिव सागर डांगे, कोषाध्यक्ष शुभम बहिरे, मार्गदर्शक कल्याण देशमुख यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी शिवजन्मोत्सवातील सर्व कार्यक्रमाची माहिती बैठकीत सादर करण्यात आली. रांगोळी स्पर्धा, दिपोत्सव व मिरवणुकीत महिलांचा सहभाग वाढण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली. रांगोळी स्पर्धेतील उत्तेजनार्थ पारितोषिक एक ऐवजी तीन करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. मिरवणुकीमध्ये घोडदळावर देखावे करण्यासाठी विद्या पवार, अलका लोखंडे यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली. दिपोत्सवा करिता कलर हिवरा रंग, मिरवणुकी करिता ऑफ व्हाईट जॉकेट व लाल रंग असा ड्रेस कोड सर्वांनुमते ठरविण्यात आला. रांगोळीची जबाबदारी राजश्री सोळंके, सिमा वडदकर तर दिपोत्सवाची जबाबदारी छाया मगर, ज्योती कोथळकर, अरुणा अंभोरे यांच्याकडे देण्यात आली. महिलांनी आपले सदस्य शुल्क वृशाली पाटील यांच्याकडे संकलीत करावे असेही ठरले. या बैठकीला साधना हेबांडे, वंदना आखरे, योगिता देशमुख, साधना घ्यार, श्रृती देशमुख, सुनिता मुळे, वृशाली पाटील, सुनिता भालेराव, अरुणा अंभोरे, वर्षा पाटील, कांताबाई कल्याणकर, जया पवार, छाया मगर, मनिषा कदम, अलका लोखंडे, विद्या पवार, ज्योती कोथळकर, सिमा वडदकर, अर्चना पवार, शोभा पवार यांच्यासह महिला भगिंनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

## महिला तलाठ्यास ट्रॅक्टर अंगावर घालून जीवे मारण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

जवळाबाजार ते पुरजळ मार्गावर पुरजळ शिवारात वाळूचे ट्रॅक्टर पकडल्यानंतर महिला तलाठ्यास ट्रॅक्टर अंगावर घालून जीवे मारण्याची धकमी देऊन अश्लिल भाषेत शिवीगाळ करणाऱ्या तिघांवर गुरूवारी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली जिल्ह्यात अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले आहेत. त्यानुसार पाचही तालुक्यात तहसील कार्यालयांतर्गत कर्मचाऱ्यांची पथके स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय त्या त्या सज्जातील तलाठ्यांची पथकेही कार्यरत ठेवण्यात आली आहेत.

जवळाबाजार ते पुरजळ मार्गावर पुरजळ शिवारातून अवैधरित्या वाळुची वाहतुक केली जात असल्याची माहीती तलाठी सुवर्णमाला सिरसाठ यांच्या पथकाला मिळाली होती. त्यावरून तलाठी सिरसाठ यांच्या पथकाने बुधवारी वाहनांची तपासणी सुरू केली. यामध्ये एका ट्रॅक्टरमध्ये वाळूची वाहतुक केली जात असल्याचे दिसून आले. यावेळी तलाठी सिरसाठ यांनी चालकाकडे विचारणा केली. समाधानकारक उत्तर न मिळाल्याने ट्रॅक्टर औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात नेण्यास सांगितले. यावेळी नागेशवाडी शिवारात ट्रॅक्टर आल्यानंतर त्याठिकाणी प्रल्हाद आहेत, गणेश घुगे यांनी तलाठी सिरसाठ यांना शिवीगाळ करून अंगावर ट्रॅक्टर घालून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी तलाठी सिरसाठ यांच्या तक्रारीवरून प्रल्हाद आहेर, गणेश घुगे व ट्रॅक्टर चालक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे हे करीत आहेत.

## योगानंदच्या विद्यार्थ्यांची ऊसतोड कामगारांना भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे सामाजिक विषयाला अनुसरून एक शैक्षणिक भेट हा उपक्रम राबवण्यात आला. समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ.संदीप गोरे व त्यांचे सहाय्यक डॉ प्रवीण पवार यांनी समाजशास्त्र विषयाच्या बी.ए. द्वितीय व तृतीय वर्षाच्या एकूण १५ विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक भेट ऊसतोड कामगारांसोबत घडवून आणली. अभ्यासक्रमांतर्गत असणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या समस्या व त्यांचे जीवन समजावून घेण्यासाठी प्रत्यक्ष भेटीचे आयोजन करण्यात आले होते, कारखाना रोडवरील मौजे जवळा खंदारबन या गावातील उस तोडणी सुरू असलेल्या शिवारामध्ये प्रत्यक्ष ऊसतोड कामगारांसोबत भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. ऊसतोड कामगारांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक समस्या त्यांच्याकडूनच समजावून घेतल्या त्यांचे जीवन किती खडतर व कष्टाचे आहे. हे विद्यार्थ्यांनी त्यांच्यासोबत मुलाखत घेऊन प्रत्यक्ष जाणून घेतले. भविष्यात समाजशास्त्र विषयातील पुढील शिक्षण करण्यासाठी त्यांना हा अभ्यास नक्कीच उपयोगी येणार आहे. सामाजिक संशोधनाचे प्रात्यक्षिक या ठिकाणी करण्यात आले. ही प्रात्यक्षिक भेट घडवून आणण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नागनाथ पाटील यांचे मार्गदर्शन लाभले या प्रात्यक्षिक भेटीमध्ये महाविद्यालयातील शिवकन्या गोरे, सरस्वती जाधव, धारू भोकरे,मुक्ता लोहटे, शितल आठवले ,कोमल आठवले, दिशा शिंदे, पूजा भारती, वैष्णवी गिरी, निकिता जाधव ,शेख सानिया, निकिता धुळे, माहेश्वरी लोहटे व पूजा बसवंते अशा विविध विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला होता. समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संदीप गोरे यांनी या प्रात्यक्षिक भेटीला सर्व ऊसतोड कामगारांनी आनंदाने प्रतिसाद दिल्यामुळे सर्वांचे आभार मानले.

## जाभंरूण शिवारात अवैध वाळू वाहतुक करणारे ट्रॅक्टर पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

कळमनुरी तालुक्यातील जांभरूण शिवारातून अवैधरित्या वाळू वाहतुक करणारे ट्रॅक्टर महसूल विभागाच्या पथकाने दि ७ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास पकडून पोलिस ठाण्यात जमा केले आहे.

कळमनुरी तालुक्यातील कयाधू नदीच्या पात्रातून तसेच काही ठिकाणी ओढ्यावरून वाळूचा अवैध उपसा करून त्याची वाहतुक केली जात आहे. विशेष म्हणजे महसूल विभागाला हुलकावणी देण्यासाठी मध्यरात्रीच्या वेळी वाळू उपसा करून पहाटेच्या वेळी त्याची वाहतूक केली जात आहे. या प्रकारानंतर जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते, तहसीलदार जीवकुमार कांबळे यांनी तलाठी तसेच महसूल कर्मचाऱ्यांचे पथक रात्रीच्यावेळी गस्तीसाठी तैनात केले आहेत.

नांदापूर शिवारातून एका ट्रॅक्टरमधून वाळूची वाहतुक केली जात असल्याची माहीती पथकाला मिळाली होती. त्यानुसार पहाटेपासून जांभरून वाहनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये एका ट्रॅक्टरमध्ये अवैधरित्या वाळू वाहतुक करतांना आढळून आले. महसूलच्या पथकाने सदर ट्रॅक्टर कळमनुरी पोलिस ठाण्यात जमा केले आहे. पुढील कारवाई सुरू होती.